मासिक

शिक्षणयात्री

- वर्ष: ८ वे
- एप्रिल २०२३
- अंक: ४ था
- किंमत: ३० रूपये

संघ शक्ती युगे युगे

मी आठवतोय पुन्हः पुन्हा

जगण्याचे अर्थ
खुडून टाकले
आहेत कुणीतरी
रातोरात

उदासीचे प्रचंड डोंगर
अडवताहेत माझे
पंखासहीत उडणे

श्वास घेणेही मुश्कील
झालेय
मला
आजकाल

कुठले छलचक्र गरागर
फिरते आहे सभोवताली

मी अडकून पडलोय
पुन्हा नव्या चक्रव्युहात

परतीचे रस्ते
शिकवलेच नाही मला
कुठल्याही गुरुकुलात

माझे गुरुही
कधीच झाले नाही
माझे मार्गदर्शक
अलीकडे तर नव्या गुरुने
छाटून घेतले आहेत
माझे दोन्हीही अंगठे

रक्तबंबाळ होतोय
मी इथल्या हरएक शस्त्र
आणि अस्त्रांनी
मला जगू देण्याचा
कुठलाही इरादा
दिसून येत नाहीय
या शासनप्रणालीत

लोकांचे, लोकांसाठी,लोकांकडून
चालवले राज्यच गायब
होतेय हळुहळू

माझे सारे
तारणकर्ते
रक्षणकर्तेच
खोदताहेत
रातोरात माझीच कबर

या कबीरवर कदाचित
हे शासन उभारेलही
माझेच स्मारक

माझ्या मतांवरच तर
जिंकताहेत माझे दिलदार दोस्त
सत्तेचे एकेक गडकिल्ले

मला भगवे लेप लावून
जयघोषात गुंगवून
आंधळे करुन टाकलेय
नव्या सत्ताधिशांनी

पुन्हा एकदा तरी
माझ्या जगण्याला अर्थ येईल
या प्रतीक्षेतच मी पुन्हा करतोय
नव्या विद्रोहाची तयारी

मी आठवतोय
पुन्हः पुन्हा
कालचा माझ्या
चक्रवर्ती सम्राटाचा
जगभर पसरलेला
अजिंक्य
समृद्ध इतिहास
जगाच्या कल्याणासाठी

शशिकांत हिंगोणेकर
जळगाव
७२१८७९२१८६

अंतरंग

राज्यघटना जगण्याची शैली झाली पाहिजे
उत्तम कांबळे /३

भूदानाची किमया
नीला आपटे /६

चला सुट्टी झाली
रेणू दांडेकर /७

सुट्टी - मुलांसाठी सुवर्णसंधी
सुरेश उतपुरे /९

गुरुजी तु मला आवडलास
बाबाराव मुसळे /११

ऐतिहासिक संपाचा साक्षीदार
राजेंद्र पाटील /१४

संपाने मला काय दिले
नारायण तायडे/१६

विश्वातील १० आदर्श शिक्षिका
सारिका रंधे/ १८

वाचनाच्या दिशेने
साधना क्षीरसागर /२०

लाखांमधील एक
एकनाथ आव्हाड /२२

मंगळ सफारी केबल कारने
प्रतिक्षा पापडकर /२४

ओळख जागतिक नागरित्व शिक्षणासाठी
राजेंद्र गिरासे /२७

टॉमी फ्रॉगमाऊथ
नंदा हरम /३०

समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...

मासिक **शिक्षणयात्री**

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

वर्ष : ८ वे अंक: ४ था एप्रिल २०२३

वार्षिक:रू.४००/- **द्वैवार्षिक:रू.७००/-** **त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
Online पेमेंट साठी - खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे
संपर्क पत्ता-
संपादक शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका,मु.पो.ता.-शिरपूर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

मार्गदर्शक
मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)
मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी
उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे
संपादन सहाय्य
विजय गायकवाड
युवराज माने
डॉ.युवराज पवार
अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे
मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार
मुखपृष्ठ
कैलास पाटील सर,शिरपूर
कार्यालय प्रमुख
जगदीश पाटील

लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.

संवाद

सुभाषदादा कुलकर्णी
संपादक

नुकताच सरकारी नोकरदार वर्गाचा त्यांच्या न्याय हक्क मागणीसाठी साथ दिवसांचा संप पार पडला.जुनी पेंशन योजना लागू करावी ही मुख्य मागणी. २००५ साला नंतर जे कर्मचारी सरकारी नोकरीस लागले त्यांना जुन्या पेंशन योजनेचा लाभ मिळणार नाही तर नवीन पेंशन योजनेचा (एन.पी.एस.) लाभ मिळण्याचा शासननिर्णय २००५ साली करण्यात आला.या निर्णयाविरोधात वेळोवेळी आंदोलने होऊन नवीन पेंशन योजनेस विरोध तिव्र होऊ लागला.त्यातच नवीन पेंशन योजना अणि जुनी पेंशन योजना यातील मुलभूत परक काहींना आज पावेतो माहित नव्हता. आणि काल परतवे दोन्ही योजनातील फरक लक्षात येऊन नवीन पेंशन योजनेत लाभाची शाश्वती नसल्याचे चित्र अधोरेखीत झाले.म्हणूनच अभी नही तो कभी नही या आदेशात राज्यव्यापी संप सुरु झाला.

या संपाने अनेक प्रश्नांची उकल केली.चर्चा घडल्या.आम्हांना पेंशन नाही मग आमदार खासदारांना पेंशन कशा साठी ? पेंशन योजना कोणी बंद केली ? नवीन पेंशन योजनेचे जनक कोण ? पेंशन का गरजेची ? कुठला पक्ष आपला तर कुठला पक्ष विरोधात ? इथपासून ते इतिपर्यंत चर्चा घडल्या.

एक मात्र नक्की या संपाने कर्मचाऱ्यात एकजुट दिसून आली.एकजुट निर्माण झाली. तसेच संपा दरम्यान विविध कृती,उपक्रम सादर करण्यात येऊन नोकरदार वर्गाची सकारात्मक उर्जा बाहेर पडली.

जनतेचा दरबारात मात्र या संपाबाबत नाराजीचा सुर प्रथम दर्शनी दिसला.सर्वसामान्यांचे कार्यालयीन कामकाजासाठी होणारे हेलपाटे त्याला कारणीभुत असल्याचे दिसून आले.

पेंशन लागु करण्यासाठी शासनाने पाऊल उचलल्याने संप स्थगित झाला.मात्र या संपाने सरकारी कर्मचारी बंधूसाठी अनेक प्रश्न निर्माण करीत आपल्या कामीप्रती निष्ठा व उतरदायित्व दाखवत जनतेच्या मनात आपुलकी निर्माण करण्याची गरज दिसून आली.

निमित्त

राज्यघटना जगण्याची शैली झाली पाहिजे!



(महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवानिमित्त बुध्दीस्ट प्रबोधन मंच शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे यांच्या वतीने आयोजित मा.उत्तम कांबळे यांचे व्याख्यानाचा अंश – ४ एप्रिल २०२३)

शिरपूर तालुक्यातील बुध्दीस्ट प्रबोधन मंचने तुमची नि माझी भेट घडवून आणली.प्रबोधन मंचच्या माध्यमातून तुम्ही सर्व नोकरदार एकत्र आले. आणि प्रबोधनाचा हा कार्यक्रम घडवून आणला. वास्तविक नोकरदार मंडळीकडे बघण्याचा दृष्टीकोन फारसा चांगला नाही. मध्यमवर्गीयांचे तसं कोणी ऐकत नाही. नोकरदार-मध्यमवर्गांवर होणार आरोप पुसण्याचं काम ही बुध्दीस्ट प्रबोधन मंचची नोकरदार मंडळी करीत आहेत. बाबासाहेबांची जयंती व बाबसाहेबांचे गुरु महात्मा फुले यांच्या जयंतीनिमत्त आजच्या कार्यक्रमात राज्यघटनेवर बोलणार आहे.

आपण नमस्कार करतो.जयभीम म्हणतो. कुणा देव देवतांच्या विरोधात जयभीम म्हणत नाही. तर का म्हणतो जयभीम ? जयभीम शब्दाचा अर्थ नेमका काय ? हा विचार आपण केला नाही. जयभीम म्हणजे बाबासाहेबांच्या विचारांशी कमीटमेंट आहे. बांधीलकी आहे. बाबासाहेबांच्या विचारांवर चालण्याचे आश्वासन म्हणजे जयभीम आहे. त्याच निळ्या मार्गावर आपणा सर्वांना चालायचं आहे.

आपला भारत देश आजही २३०० वर्षे जुन्या मनुस्मृतीवर रेंगाळतो आहे. जन्माला येणारा माणूस कोण असेल हे भाकीत मनूने केलंय. कोणी कोणत्या जातीत जन्माला यावं हे आधीच ठरवलं गेलं आहे. जातीच्या पोटी जातच येते. माणूस जन्माला येत नाही. पण मनूला एक भाकीत करता आले नाही. ते म्हणजे राज्य घटना लिहणाऱ्या बाबासाहेबांचा जन्म!बाबासाहेबांच्या जन्मानंतर उजेडयुगाची सुरुवात झाली.मनुचा मृत्यू झाला. अंधारयुगाची समाप्ती झाली.विज्ञान विचारांचा उदय झाला.

राज्यघटनेचा जागर खऱ्या अर्थाने १९८० पासन सुरु झाला.राज्यघटना १९४९ ला अर्पण केली गेली तरी राज्य घटनेची पूजा करायला १९८० साल उजाडले. आपण

आजही राज्य घटनेला उदबत्तेही लावतो नीळ वाहतो. पाया पडतो.मिरवणूका काढतो सप्ताह पंधरवाडे साजरे करतो, आयोजित करतो.का ? हे का घडते आहे? यावर विचार करावा लागणार आहे. १९८० सालापासून खाजगी करण उदारिकीकरण जागतिकीकरण या माध्यमातून नव्या भांडवलशाहीचा उदय झाला. या खाऊजा धोरणाने जगात सगळ्याच देशांना, माणसांना लोकशाहीला धक्के बसू लागले. चटके बसू लागले आणि म्हणूनच राज्यघटनेची खऱ्या अर्थाने पारायणे सुरु झाली आणि आतातर राज्यघटना वाचवण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे.

राज्यघटना ही काही कथा कादंबरी नाही मनोरंजनाचे साधन नाही. तर राज्य घटना म्हणजे भारतातल्या सर्वांन, दीन दुबळ्या माणसांना वाचवण्याचं एकच कवच कुंडल आहे. मी माणूस आहे हे सांगण्याचं धारिष्टयच राज्यघटना देते. राज्य घटना आहे म्हणूनच शाळेतल्या तीस कोटी पोरांना खिचडी मिळते.शिकायला शाळा मिळते. पळायला मैदान मिळते. आपल्या सर्वांचं दिल दौलत दुनिया म्हणजे राज्यघटना आहे.

या राज्यघटनेचा जन्म काही दोन चार वर्षात झाला नाही. घटना समिती स्थापली आणि राज्यघटना तयार झाली असे नाही तर या राज्यघटनेने जन्मकळा पाहिल्या आहेत. प्रसववेदना भोगल्या आहेत. भारतात पूर्वी राजे रजवाडे सरदार संस्थानिक होते. तेव्हा सारं काही दैवी शक्तीवर अवलंबून आहे. ह्या समजावर चालले होते. नंतर इंग्रज आले. ईस्ट इंडिया कंपनी आली. कारभारात सुसूत्रता आणण्यासाठी नियम आखले जाऊ लागले. कठोरता येऊ लागली. सती प्रथा बंदीचा कायदा जाचक वाटू लागला नंतर १८५७ ला इंग्रजा विरुध्द बंड पुकारले गेले. त्यानंतर इंग्लडच्या राणीने भारतात कायद्याचं राज्य येणार अस घोषित केलं. यातच राज्य घटनेचे बीज रोवले गेले.

इंग्रजानी रेल्वे आणली तेव्हा अस्पृश्यता दूर करण्याचं महत्व काम रेल्वेनं केलं.स्पृश्य - अस्पृश्य सारेच मांडीला मांडी लावून बसू लागले. इंग्रजाच्या औद्योगी करणाने जाती व्यवस्थेला धक्के बसू लागले. सुधारणांना सुरुवात झाली. आय.सी.एस.सारख्या परिक्षा भारतीयांना देता यावी यासाठी चळवळ झाली.मागण्या होऊ लागल्या आणि या मागण्यांचे कायद्यात रुपांतर होऊ लागले. हीच राज्य घटनेची प्रक्रिया! स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले होते.१९३५ पावेतो स्वातंत्र्य मिळेल असे वाटत असतांना १९३०- ३१ साली गोलमेज परिषदेत डॉ.बाबासाहेबांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे राज्य कसे असेल ? कुणाचं असेल ? कुणाला स्वातंत्र्य मिळेल असे सवाल करुन राज्यघटनेच्या बीजांना खतपाणी घालण्याचं काम केलं होतं.

वास्तविक अस्पृश्य समाजाला समानतेचा अधिकार मिळावा यासाठी १९२० महाडच्या चवदार तळ्याच्या आंदोलनापासून ते नाशिकच्या काळाराम सत्याग्रहा पावेतो आंदोलने नि मागण्या सुरु होत्या. मात्र हिंदु असून आमच्या अस्पृश्यतेचा डाग जात नाही. हे पाहून १९३० गोलमेज परिषदेत आम्ही अस्पृश्य हिंदू धर्माचे नाही हे डॉ.बाबासाहेबांनी ठासून सांगत उद्या मिळणाऱ्या स्वातंत्र्यात आम्हाला काय स्थान असेल हा प्रश्न विचारल्याने उद्याच्या भारताबाबत कायद्यांबाबत विचार सुरु झाला.

१९३५ साली ब्रिटीशांची कमेटी भारतात आली.यावेळी राज्यघटना कशी असावी यासाठी ब्रिटीशांनी १९३५ साली कमेटी नेमली या कमेटीला अनेक निवेदने प्राप्त झाले. डॉ.बाबासाहेब यांनी सुध्दा स्टेट ॲन्ड मायनॉरिटी हे निवेदन कमेटीकडे सुपूर्द केले. याच निवेदनात राज्यघटनेची प्रतिबिंब दिसत होते.

भारतातील औंध हे संस्थान. भवानराव हा या संस्थानचा संस्थानिक होता. ७२ गावं या संस्थानात होती. भवानराव हा गांधी विचारांचा होता आपल्या गावात लोकशाही असावी या विचाराने प्रेरित होता. त्याने गांधीजीकडून १९ पांनाची राज्यघटना लिहून घेतली. आणि १९३५ पासून औंध संस्थानचा कारभार घटनेवर आधारित होऊ लागला.

नंतर संविधान समितीची स्थापना झाली.या समितीत खासदार मंडळी होती. डॉ.बाबासाहेब ही होते.पुढे बाबासाहेब ज्या मतदार संघाचं प्रतिनिधीत्व करायचे ते पाकीस्तानात गेल्याने खासदारकी गेली पर्यायाने संविधान समितीचे सदस्यत्व रद्द झाले.नंतर मात्र नेहरु - गांधी यांनी

पुण्याचे जयकर या खासदारांचा राजीनामा घेऊन त्यांच्या जागी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना खासदार करुन त्यांचा संविधान सभेत येण्याचा मार्ग मोकळा केला. कारण त्याकाळी भारतात बॅरिस्टर जीना,डॉ. बाबासाहेब आणि काश्मीरचे राव हे तीनच कायदेतज्ञ होते आणि डॉ.बाबासाहेब एकमेव भारतीय कायदेतज्ञ असल्याने महात्मा गांधीचा त्यांचेवर विश्वास होता.

डॉ.बाबासाहेबांनी राज्यघटना कशी असावी यासाठी लोकांचे मत मागवले.अनेकांचा प्रतिसाद मिळाला. मते मिळाली.काहींनी गांधीच्या केंद्रस्थानी असलेलं गाव राज्यघटनेचा केंद्रबिंदू असावा असा विचार मांडला मात्र डॉ.बाबासाहेबांनी सामान्य माणसाला केंद्रबिंदू माणून राज्यघटनेची पायाभरणी केली.

राज्यघटनेची उद्देशिका पंडित जवाहरलाल नेहरुंनी लिहली होती.ती खुप दीर्घ असल्याने डॉ.बाबासाहेबांनी उद्देशिकाचा सारांश केला आणि आम्ही भारताचे लोक हे शब्द पेरुन राष्ट्रप्रेमाचे चैतन्य पेरण्याचे महान कार्य केले .

शेल्सपीअर म्हणतो त्याप्रमाणे विचार करणारे लोक धोकादायक असतात. म्हणून आपणही विचार करा. इतिहास समजून घ्या. विचारांच्या मिरवणूका काढा जगातलं कोणतंही राष्ट्र विचारी माणसांना घाबरतं.विचारी माणसं ही अणुबॉम्बसारखी असतात. राज्यघटनेला आपली जगण्याची शैली बनवली पाहिजे. आपण राज्यघटना वाचून जगलो पाहिजे. राज्यघटनेने आपल्याला न्याय दिलाय. स्वातंत्र्य दिलंय समता दिलीय सामाजिक न्याय दिलाय महत्वाचं म्हणजे माणूसपणाची ओळख दिलीय.मी कोण हे आपल्याला कळलं पाहिजे. श्रध्देच्या आवरणाखाली महापूरुषांना बसवू नका. जयंत्या उत्सव साजरे करा . पण विचारांच्या मिरवणूका काढा. शाहू फुले आंबेडकरांचा फक्त जयघोष केला म्हणजे झाले असे नाही तर राष्ट्रनिर्माणासाठी त्यांच्या विचारांचा वारसा चालवा

–उत्तम कांबळे

सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका

शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

विनोबा भावे स्मृती

भूदानाची किमया

नीला आपटे
बेळगांव

१८ एप्रि ल १९५२ या दिवशी न भुतो न भविष्यती अशी एक अद्‌भूत घटना भारतातील एका छोट्या गावामध्ये घडली. जमिनीवर मालकी हक्क सांगण्याचा आणि जास्तीत जास्त जमीन, राज्य, प्रदेश आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न मानवाकडून अगदी पौराणिक काळापासनू केला जात आहे. जगात झालेल्या सर्व लढाया जमिनीच्या मुद्यावर झालेल्या आहेत. आपल्या देशातही पूर्वीपासून जी अनेक राज्ये अस्तित्वात होती, आपापसात लढत होती ती सारी भूप्र देशाच्या मालकीसाठीच! असे असताना, राजा- महाराजा किंवा कोणत्याही प्रकारची सत्ता हातात नसलेल्या एका नि:शस्त्र माणसाला, विनोबांना पोचमपल्ली या गावात अद्‌भूत असा अनभुव आला. विनोबांनी गावातील जनतेशी मुक्तपणे संवाद साधला, गावातील शोषित-दलित- पीडितांची गाऱ्हाणी ऐकून घेतली आणि त्याच गावातील सुस्थितीतील जमीनदार श्रीमतं व्यक्तींना नम्रपणे आवाहन केले. पाणी - हवा - सुर्य प्रकाश या सर्वां प्रमाणेच जमीन देखील सर्वांची आहे. त्यावर कोण्या एका व्यक्तीची मालकी असू शकत नाही. आपण सर्वजण पृथ्वीची लेकरे आहोत, मालक नाही. पौराणिक काळात आपल्या देशात जमिनीवरून महाभारत घडले.कारण पांडवांना त्यांची हक्काची जमीन नाकारली गेली. आता पुन्हा तसे महाभारत घडू नये असे आपणास वाटत असेल तर आपल्या पीडीत वंचित भावा बहिणींना त्यांच्या हक्काची जमीन मिळाली पाहिजे. आपल्या गावातील भूमिहिनांना त्यांच्या हक्काची जमीन द्यायला कोणी तयार आहे का? असा सवाल करत विनोबांनी थेट जनतेच्या ह्रदयालाच साद घातली. विनोबांचे भाषण ऐकता क्षणी गावातील एक दानशूर जमीनदार वेदिरेरामचद्रं रेड्डी सभेमध्ये उभे राहिले आणि आपल्या कडची ८० एकर जमीन दान म्हणून देऊ केली. तो दिवस १८ एप्रिल चा होता. म्हणनू हा दिवस भुदान जयंती दिवस म्हणून ओळखला जातो. विनोबांसाठी हे सर्व अनपेक्षित होते. आपल्या देशात जसे भूमीहीन शेतमजूर आहेत तसेच दानशुर जमीन मालक ही आहेत जे भूमीहिनांना त्यांच्या हक्काची मदत देण्यास तयार होतील, याची जाणीव विनोबांना त्या दिवशी झाली. त्यानतंर विनोबांनी स्वत: दरिद्री नारायणाचा प्रतिनिधी म्हणून देशभर फिरून जमीन मागण्याचा आणि भूमीहिनांना त्यांच्या हक्काची जमीन मिळवून देण्याचा संकल्प केला आणि त्या क्षणी त्यांचा भूदान यज्ञ सुरु झाला. त्यानतंर विनोबा पुढील तेरा वर्ष भारतभर पायी फिरले. असेच जनतेला जमीन दान करण्याचे आवाहन करत आणि मिळालेली जमीन भूमीहिनांना वितरीत करत केलेल्या तेरा वर्षांच्या अविरत भूदान यज्ञा मध्ये भारतातील दानशुर जमीनदारांनी ४७ लाख एकर जमीन अर्पण केली. मध्य भारतातील उन्हाळ्याच्या झळा सोसत, ईशान्य भारतातील मुसळधार पाऊस अंगावर घेत, उत्तर भारतातील कडाक्याची थंडी सहन करत आणि राजस्थानच्या रणरणत्या उन्हात, कधी कधी अंग तापाने फणफणले असताना सुध्दा अथकपणे, अविरतपणे, विनोबा ध्यासपथी चालत राहिले. जगाने आज पर्यंत जमिनीसाठी खुन पडताना, युध्द होताना, हिंसाचार माजताना पाहिले होते.त्यामुळे अहिसंक मार्गाने जमिनीच्या प्रश्नावर उपाय करण्याच्या वि नोबांच्या भूदान चळवळीने मात्र जगातील भले भले समाज सुधारक व समाज अभ्यासकही आश्चर्यचकित होत होते. तो पर्यंत अशा प्रकारच्या कामाची कल्पनाही कोणी केलेली नव्हती. म्हणूनच भूदान यज्ञाच्या माध्यमातून विनोबांनी सामाजिक क्षेत्रात एक मोठी क्रांती घडवून आणली आहे असेच म्हणावे लागेल.

- ९४०५९२४२२७

चला सुट्टी झाली!

रेणू दांडेकर
दापोली

एप्रिल मध्ये परिक्षा संपतात. मग शाळा ओस पडते. मुलं येईनाशी होतात. आपलं शिक्षकांचं वर्षाच्या समारोपाचं काम सुरु होते.वर्षभराची कामं, निकाल आणि त्यात उन्हाळा!शाळा सकाळच्या होतात.दुपार मग चिंतन करण्यासाठी स्वप्न बघण्यासाठी मोकळी राहते. मुलं तर म्हणत असतात. चला सुट्टी झाली! आता खूप खूप खेळायचं... आपल तसं नाही ना! म्हणा आता मोबाईल आले म्हणून आम्ही केव्हा ही खेळू शकतो, हसू शकतो, गप्पा मारु शकतो. तो भाग वेगळाच. समर व्हेकेरान विंटर व्हेकेशन हे खरं म्हणजे ब्रिटीशांचं देणं आहे. ते आपण आनंदानं स्वीकारलं. इतर चांगल्या गोष्टी स्वीकारल्या नाहीत तो मुद्दा वेगळाच अहो, वर्षभर कामं करुन कंटाळा येतो. पोरं हाकून हाकून दमून जायला होतं.. जरा आराम नको असं सुट्टीबाबत स्पष्टीकरण कानावर येतं नि शिक्षकांचं बरं आहे. सुटयाच सुट्या असं म्हणून इतरांनी टीका केलेलं ऐकू येतं तसं पाहिलं तर आपली खरंच मजा असते. मोठ्या सुटटया, छोट्या सुट्टया,प्रासंगिक सुट्टया,घोषित सुट्टया, हक्कांच्या विशेष दिनाच्या सुट्टया आणि रजा ! असं मिळून ३६५ दिवसांपैकी किती सुट्टया मिळतात आपल्याला! आणि पगार वर्षांचा! खरंच मजा आहे, आपलीच ! असू दे!'हे माझे भाग्य बघून जळफळतील देव ते'असं भा.रा.तांबे जणू माझ्या बाबतीतच बोलतात की काय? सुट्टीत कुणी चुकून शाळेत बोलवलं तर माझ्यावर खूपच अन्याय होतो, हक्कांवर घाला घातला जातो. किंवा सुट्टी नाकारली तरी. असो.

सुट्टीचा किती छान उपयोग अनेकांनी केल्याचं माझ्या लक्षात आलं,म्हणजे अशी माणसं भेटली नि मी अंतर्मुख झाले. त्या अनुभवात तुम्हांला सहभागी करुन घ्यावं असं मला वाटतं ! काय सुट्टी लागली ना? आता मजा आहे. यंदा काय कशी घालवणार सुट्टी?.... मी एका शिक्षकांशी बोलत होते. मी विचारलेल्या कोणत्याच प्रश्नाचं उत्तर त्यांनी दिलं नाही, मी मनात म्हणाले'विचारलेल्या प्रश्नाचं उत्तरच देता येत नाही यांना, मग नेमकं उत्तर तर लांबच राहिल. मी त्यांच्याशी बोलायचं थांबले, ते म्हणाले गेले वर्षभर मी वर्गाचे गट केले होते. उत्तम,चांगला, मध्यम, बरा,अप्रगत, वर्षभर वेगळं काही करत होतो. पण पुरेसा वेळ मिळत नव्हता. आता पुढच्या वर्षाचं नियोजन कारणार आहे. मनात असतांना तयारी करुन घ्यायला मी कमी पडलो.खूप काही सराव साहित्य बनवणणार आहे, प्रत्येक वर्गातल्या म्हणजे मी शिकवतो ते वर्ग ती मुलं.. मला महिती आहेत.त्यांची निरीक्षणे मी नोंदवली आहेत. त्यांच्यासाठी वेगळे प्रयत्न मला करायचेत. वेळ द्यायचाय. काही ना मी घरी बोलवलंय. मुलांनी यायचं कबूल केलंय.. मी काय बोलणार? कारण मी निरुतर झाले.

एका शिक्षिकेला हाच प्रश्न विचारला.त्यांना वाचनाची आवड असावी. त्या म्हणाल्या मी मराठी,इतिहास शिकवते.गेल्या कित्येक सुट्टया मी प्लॅनिंग केलंय आणि तसंच माझं घडत आलंय. मी विचारल काय केलं तुम्ही प्लॅनिंग? त्या म्हणाल्या,मराठीच्या पुस्तकात ज्यांचे ज्यांचे धडे कविता असतात, त्यांचे त्यांचे किमान

एक पुस्तक वाचायचं मी ठरवलं, जमेल तसं वाचते खूपच त्यामुळे वेगळं घडतं, एखाद्या कथेतला लहानसा भाग असतो. कादंबरीलाही तसंच असतं. परिचयात गोषवारा असतो पण संपुर्ण कथानक नसंत त्यामुळे मुलांशी बोलताना संदर्भ तुटल्यासारखे वाटतात. यावर मी भर देते. आता लहानशा गावात उपलब्धता नसते पण मिळतं प्रयत्न केल्यावर.. मला खरंच नवल वाटतं होतं आणि स्वत:ची लाजही ! मी विचारलं कवितेच्या बाबतीत काय करता हो ? त्यांनी विचारलं तुम्ही एवढी चौकशी का करताय ? मी लगेच म्हणाले सुट्टीत काण कोण काय करतं याचा शोध घेतेय.....असाच माझ्या समृध्दीसाठी....त्या म्हणाल्या कवितेच्या बाबतीत मी थोडा वेगळा विचार केलांय दोन प्रकारे वाचन करतेय कवितेचाा प्रकार त्यात वेगवेगळ्या कवींच्या कविता आणि एक कवी त्याच्या वेगवेगळ्या कविता..मजा येते... शिवाय यातही माझ्या मनात आलं की कविता चांगल्या आहेत. पण पाठ्यपुस्तकात नाहीत या कवितांचे फ्लेक्स बनवलेत वर्गात लावते, त्यालाही चाली लावल्यात... इतिहासाविषयी त्यांची जाण पाहून नि विनाखर्च त्यांनी केलेली साहित्य निर्मिती पाहून उलट मी सुट्टीला धन्यवाद दिले.

कुणी वाचन करायचे ठरवले होते. कुणी दर सुट्टीत भारत दर्शन करत होतं. या शिक्षकांशी बोलतांना ते म्हणाले मी एकटा नाही फिरत. आम्ही सगळे जातो. नंतरचा महिना जरा चणचण असते. त्याची सवय झालीय. शिवाय सणावारी होणारा वायफळ खर्च आम्ही शिकलेत टाकतो. एक वेगळे खातेच उघडलेय.दर महिन्याला त्यात एक रक्कम टाकतो. कमी पडते ती त्या महिन्यात... देश पहायला हवा इथेही फक्त प्रेक्षणीच स्थळे नाहीत तर गाव, गावचे सण, भाषा,कपडे, रिवाज याचा जेवळा अभ्यास करता येईल, अभ्यास म्हणण्यापेक्षा निरीक्षण करता येईल तेवढे करतो, मजाही करतो, मुलांना पण आता सवय झाली. अहो, मला गंमत वाटते की, मलाही एवढी माहिती नव्हती, पुस्तकात वाचून इतके काही कळत नाही होतं खरं तर मजा येते अगदीच.. किती वेगळा विचार करतात ही शिक्षक मंडळी मलाच माहित नव्हतं.. कारण मी असा शिक्षकांचा शोघ घेताच नव्हता. किंवा मला जाणीव नव्हती.अशी उदाहरणे जेव्हा मी पाहते तेव्हा मला वाटतं चला सुट्टी झाली आता खूप खूप काही करायचं...

अशी खुप उदाहरणं मला भेटली. माणसं करतायत जे आपण अनुभवतोय ते आपण शअेर करुया. एकमेकांशी बोलूया अशी उदाहरण आपण आपल्यापुढे देऊया. आपण आपला प्रवास त्या दिशेने करुया मजा येईल, आपल्याला नवी दिशा मिळेल. आणि काहीच न करता असाच वेळ जाऊदेणार नाही, आपला नाहीतर मग अरे , बापरे सुट्टी कशी संपली ते कळतच नाही असंच आपण म्हणूया.

सुट्टीत वाचूया. नव्या वेगळ्या शाळा बघूया. चांगली कामं बघुया. वेगळ्या माणसांना भेटूया.. त्यांच्याशी बोलू या... त्यांना समजून घेऊया.. थोडा वेळ आपण निवांत व्हायला हरकत नाही पण काही काळ तरी आपण शिक्षक आहोत म्हणून आपल्याला समृध्द करायला हीच ती वेळ आहे, खुप काही रायचं ठरवूया. म्हणजे काही तरी नक्की घडेल, दरवेळी शाळा डोळ्यापुढे ठेऊनच करायला हवं असं नाही, चांगले कलात्मक विटपट पाहणं होत नाही ते पाहता येतील. एखादी आवड असते ती जोपासता येईल, काही बनवायला शिकता येईल. आता तर तंत्रज्ञान इतकं उपलब्ध आहे. की आपल्यालाही निर्माण क्षमतेला घश्र बसल्या गुरु उपलब्ध होईल.

थोडक्यात काय तर आपण सुट्टीसाठी नाही तर सुट्टी आपल्यासाठी आहे. अगदी कुटुंबासाठी वेळ देता आला तरी आनंद वाटेल. खरं सांगू लहान लहान गोष्टी करण्यात आनंद असतो त्या आपल्या शेजारी असतात पण जाणवत नाहीत.माणूस माणसाला भेटणे अवघड झालंय आपल्यामुळे आपण रोजच दिवस रुटीन बनलो तर मुलं काय बनतील आणि आपल्या सारख्या अनेक गोष्टीन येणाऱ्या नवनवीन गोष्टी आत्मसात केलेल्या माणसांबरोबर मुलांना त्यांचा दिवस घालावयाला आवडेल तुम्ही विचार करा आणि तुमच्या प्रश्नाचं उत्तर द्या...

-९३५६८०५४६१
renudandekar@gamil.com

सुट्टीचा सदुपयोग

सुट्टी-मुलांसाठी सुवर्णसंधी!

सुरेश उतपुरे
मलकापूर-बुलढाणा

मार्च एप्रिल महिन्याने सुरू झाली की, विद्यार्थ्यांना वेध लागतात ते उन्हाळी सुट्टीचे. तर या सुट्टीच्या कल्पनेने पालकांच्या पोटात गोळा उभा राहतो. सुट्टी सुरू झाली की, मी हे करणार, ते करणार, अजिबात लवकर उठणार नाही. अभ्यासाचं तर नावही काढणार नाही. असं म्हणणारी मुलं सुट्टी सुरू झाल्यावर पहिल्या एक-दोन दिवसातच कंटाळतात. एवढ्या मोठ्या सुट्टीचा आता करायचं तरी काय, हा प्रश्न त्यांना सहाजिकच पडायला लागतो, तर सतत अर्ध्या तासाने 'आई मला कंटाळा आला. मी काय करू?' अशा भूणभुनीला पालकही वैतागतात. यातून मग व्यक्तिमत्व विकासाच्या विविध शिबिरांना मुलांना पाठवण्याचा पर्याय पुढे येतो. पण हा एकमेव पर्याय आहे का? याचा पालक म्हणून आपण किती विचार करतो.

खरं तर अशी सुट्टी म्हणजे पालक आणि मुलं यांच्यात नव्याने नातं निर्माण करण्याची एक संधी असते. त्यांच्याशी संवाद फुलवण्याचा प्रयत्न जर आपण पालकांनी केला, तर मुलांना ते हवच असतं. पण नोकरी व्यवसायामुळे ते प्रत्येकाला जमेलच असं नाही. पण, ज्या पालकांना शक्य आहे, त्यांनी आवर्जून आपला काही वेळ मुलांसाठी राखून ठेवा. या वेळेत मुलांसोबत करता येतील अशा काही ॲक्टिव्हिटीज जरूर करा. मुलं जर पोहायला जात असतील, तर एखादा दिवस आपणही त्यांच्याबरोबर पोहून यायला काय हरकत आहे? किंवा सायकल, टू व्हीलर आपल्या मुलांना शिकवा. यामध्ये एकमेकांबरोबर होणारा संवाद अनेकदा मुलांचं मनोबल वाढायला मदत करतो.

रोज सकाळचे जेवण आपल्या मुलांसोबत करा अन्न वाया जाऊ देऊ नका त्यांचे ताट त्यांना धुवू द्या. बाजारहाट करताना आपल्या मुलांना बरोबर घ्या. बाजारात गेल्यावर किती प्रकारचे रंग, वास अनुभवायला मिळतात ते शिकवा.



पालक, चवळी, माठ, मेथी या पालेभाज्यांमधला फरक ओळखायला मुलं यातूनच शिकतील. भाजी निवडणे,

झाडणे, लोटणे, कपडे धुणे अशी कामे त्यांना करण्यास प्रोत्साहन द्या. एखाद्या दिवशी मॉलमध्ये जाऊन वाणसामान खरेदी करा. यावेळी विविध डाळी, कडधान्य, त्यांचे प्रकार, आकार, रंग, जाडेपणा, बारीकपणा यावर अवलंबून असणारी चव यांची त्यांना ओळख करून द्या. शेजारी राहणाऱ्या कुटुंबाकडे जाऊन त्यांच्याशी जवळीक वाढविण्याची संधी द्या. दुसऱ्याच्या मुलांना आपल्या घरी बोलवा. भाज्या कशा निवडायच्या? कोणत्या भाज्या मोडायच्या? कोणत्या चिरायच्या? या गोष्टी यातून मुलांना कळतात. गप्पा मारत, मटार सोलतान दाणे डब्यात कमी आणि पोटात जास्त गेल्यानंतर येणारी मजा आपल्या मुलांबरोबर अनुभवण्यासारखी असते. आजी आजोबांसोबत गप्पा मारण्याची संधी द्या.त्यांच्यासोबत मुलांचे फोटो काढा.

आपल्या कामाच्या ठिकाणी मुलांना घेऊन जा.आपण किती कष्ट करतो. कोणते काम करतो. हे मुलांना कळू द्या. त्यांची माहिती मुलांना द्या. स्थानिक यात्रा बाजार अशा ठिकाणी मुलांना सोबत न्या. आपल्या लहानपणीच्या आठवणी आपल्या पूर्वजांची माहिती मुलांना सांगा. मुलांच्या प्रश्नांची उत्तरे द्या. त्यांना बोलते करा. मुलांना येते नुसार१ ते ३ तास अभ्यासासाठी घरातील नेमून दिलेल्या ठिकाणी बसवा. मुलांना खेळू द्या, पडू द्या, कपडे खराब होऊ द्या.मुलांना किमान एक तरी पुस्तक विकत घेऊ द्या.स्वतः मोबाईलचा मर्यादित वापर करा. मुलांचा चेहरा दोन्ही हातात धरून त्यांच्या डोळ्यात डोळे घालून बघा. ईश्वराने किती अनमोल भेट आपणास दिली आहे.याचा आनंद घ्या.मुलांचे सर्व हट्ट पुरविणे म्हणजे चांगले पालकत्व,ही खुळचट कल्पना डोक्यातून काढून टाका.

आज आपल्या मुलांच्या हातात स्मार्टफोन आहे. या फोनमध्ये असणाऱ्या युट्युबच्या मदतीने कधीतरी त्यांना आवडणारी एखादी सोपी पाककृती त्यांना करायला सांगा. मुलांच्या मदतीला आपण उभे राहायचं. पण आपली मदतही त्यांना पूरक म्हणून करायची, तर मोठ्या मुलांना काही वेळा पुरता स्वयंपाकघराचा ताबा द्यायचा. हल्ली तर मुलींच्या जोडीला मुलांनाही प्राथमिक स्वयंपाक शिकून घेण्याची गरज आहे. कारण नंतरच्या काळात शिक्षणानिमित्त, नोकरीनिमित्त बाहेर एकट राहण्याची वेळ आली, तर जड जायला नको. यासाठी अशा सुट्ट्यांचा उपयोग पालकांना करून घ्यायचा आहे. मुलांनी बनवलेले पदार्थ कौतुक करत घरातल्या सगळ्यांनी एकत्र बसून खाल्ले की, त्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर तुम्हाला नक्की बघायला मिळेल.

सुट्टी लागली की, कुठेतरी ट्रीप पिकनिकला जाण्यापेक्षा आपल्या जवळच्या नातेवाईकांकडे आपण पाल्यांना घेऊन आवर्जून जावं. यातून एकमेकांच्या ओळखी तर होतीलच, पण इतरांकडे गेल्यावर पाळायचे एटीकेट्स नकळतपणे मुलं आत्मसात करतील. याशिवाय संध्याकाळी बॅडमिंटन, क्रिकेटसारखे खेळही मुलांसोबत आवर्जून खेळा. दुपारी पत्ते, कॅरम यासारखे खेळ खेळा. यातून मुलांना टीमस्पिरिट कळतं. अगदीच काही नाही, तर जुन्या फोटोंचे अल्बम काढा. ते फोटो परत बघा, त्या आठवणी पुन्हा एकदा जगा. दोन तीन तास त्या आठवणींमध्ये कसे जातील हे कळणार नाही. माझे एक मित्र दर सुट्टीत त्याच्या मुलांना घेऊन अनाथाश्रमात जायचा. तिथे काही वेळ तिथल्या मुलांसाठी द्यायचा. हळूहळू त्याच्या मुलांनाही या सगळ्यांची गोडी लागली. आज त्याच्या मुलांना सुट्टीत काय करायचं हा प्रश्न कधीच पडत नाही, कारण अनाथ आश्रमातल्या मुलांसोबत करायच्या अनेक गोष्टी त्याच्याकडे तयार असतात.

पालक म्हणून यातले काही प्रयोग मी स्वतः केलेले आहेत किंवा अजूनही करत आहे. यातून कळत-नकळत माझ्या आणि माझ्या मुलांमध्ये जे बॉर्डिंग तयार झालं आहे, ती इतर कोणत्याही आनंदापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. म्हणून आम्ही शिक्षक आणि तुम्ही पालक मिळून उद्याचे सुजाण नागरिक घडू या.

(सुरेश बंशी उतपुरे हे जि.प.मराठी उच्च प्राथमिक शाळा घिर्णी ता.मलकापूर जि.बुलढाणा येथे कार्यरत)

-९६५७५७९७८५

गुरुजी तु मला आवडलास!

बाबाराव मुसळे
वाशिम

आता आज रोजी मी नेमके काय वाचतो याकडे वळतो . गेली पाच सहा वर्षे मी युवराज माने या पारडी ता. सेलू जिल्हा परभणी येथील जिल्हा परिषद शाळेत सहशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या एका अत्यंत उपक्रमशील शिक्षकाशी जुळला गेलेलो आहे . ते माझे वाट्सप फ्रेंड असल्याने त्यांच्या उपक्रमाविषयी मला वारंवार पोस्ट टाकत असतात . त्यातल्या काही पोस्ट मी वाचतो . काही वाचणे शक्य होत नाही . मधल्या काळात त्यांनी त्यांच्या ‘ पहिलं अक्षरलेणं शब्दप्रभूंना अर्पण ‘ (गुरूजी ,तू मला आवडलास ! – पृ–१५५ वर जी मान्यवरांची यादी दिली त्यात माझाही उल्लेख आहे) या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील अनेक क्षेत्रांतील मान्यवरांसोबत मलाही संधी दिली होती . त्या उपक्रमात त्यांच्या वर्ग सहावीच्या एका विद्यार्थीनीने मला तिच्या आयुष्यातील पहिले पत्र पाठविले होते . ती मुलगी बहुतेक शिवानी लंघे वर्ग ६ वा ही होय . कारण तिने आणि इतर काही मुलींनी मिळून मला दि . ०५ –१० –२०१६ रोजी पाठविलेल्या एका पत्रात दोन मोरपिसे पाठविली होती . ती मी माझ्या शोकेसवर मुद्दाम चिटकविली .

युवराज माने हे मनोगतात म्हणतात ,'१५ वर्षांपूर्वी मी शिक्षक म्हणून रूजू झालो खरा ;पण 'गुरूजी' म्हणून माझा जन्म झाला तो तांड्यावरील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणतांना ' (पृ–९) . मानेंना मुख्याध्यापकांनी ‘ यावर्षी तुमच्याकडे वर्ग पहिलीचा कार्यभार आहे '(मनोगत पृ–१०). आणि हे आव्हान त्यांनी सहर्ष स्वीकारले . कारण सेवेत रूजू झाल्यापासून पहिल्यांदा ते या वर्गाला शिकविणार होते .या निमित्ताने ‘ पुन्हा एकदा बालपणात जाण्याची संधी मिळणार ‘ (मनोगत –पृ–१०) ही त्यांची भावना होती . आणि संगर सुरू झाला तो उपक्रमांमागून उपक्रमांचा. त्यामुळे ‘ अरे ,इथे मजा आहे की !' हा विश्वास त्या

बालकांच्या मनात त्यांना रुजविता आला. वर्गात ठेवलेले फुगे ,चित्रं ,झाडांची पानं ,तोरणं ,खेळणी या सगळ्यात ती रममाण झाली . एक मुलगी आईचा पदर सोडायला तयार

नव्हती . ती रडत होती . बाकी मुलं खेळण्यांत गुंतली. मुलांच्या पावलांचे ठसे पहिल्या दिवशीच घ्यायचे असं त्यांनी ठरविलं . त्यात मुलांनी स्वतःच्या पसंतीचे रंग दाखवून ठसे दिले . त्या रडणाऱ्या ममतानेही यात सहभाग घेऊन पसंतीचा रंग दाखविला . एकाही मुलाने काळा रंग पसंत केला नाही ' हे पहिल्या दिवसाचे निरीक्षण होते . आठ दिवसांत ३० 'आनंदाची झाडं ' प्रवेशित झाली . शिक्षक हा ' आनंदाची डहाळी ' आणि मुलं ' आनंदाची झाडं' ही संकल्पना मानेंनी प्रत्यक्षात आंणण्यासाठी अविरत कष्ट घेतले . एरवी पहिला वर्ग शिकविण्याचा ताण मानेंसारखे फ़ार कमी शिक्षक घेतात . पहिला वर्ग शिकविणे म्हणजे नो टेंशन . फ़ळ्यावर क ,ख ,ग , घ ,ङ लिहून ठेवलं की महिना महिना ते पुसायचं काम नाही . असंच मीही शिकलो होतो . त्यामुळे मान्यांचं काम हे अफ़लातून वाटलं . उपक्रमशीलता हा त्याचा आत्मा आहे . त्यासाठी कल्पकता महत्वाची . ती त्यांच्या ठायी ठासून भरलेली आहे . या १८२ पेजेसच्या पुस्तकात किती उपक्रम असावेत ? मी ३० पर्यंत नोंदून घेतली . नंतर ते सोडून दिलं. कल्पकतेमागे रेटा असावा लागतो तो कृतीशीलतेचा . त्यासाठी खूप आटापिटा करावा लागतो . खूप चीजवस्तू जमा कराव्या लागतात . माने बऱ्याच गोष्टी निसर्गातल्याच वापरतात . क्वचित काही गोष्टी त्यांनी विकत आणल्या . काही गोष्टी मुलांना घरून ,निसर्गातून जमा करून आणायला लावल्या . त्यात घरातल्या अडगळीतल्या वस्तूही समाविष्ट झाल्या . मुलांना हे करणं खूप आनंददायी वाटलं . त्यातून त्यांची उत्सुकता वाढीला लागली . वस्तू आणणे ,त्या वर्गात गुरूजींना अन इतर मुलांना दाखविणे यातही स्पर्धा सुरू झाली . जितके गुरूजी बिझी त्यापेक्षा किती तरी पटींनी मुलं बिझी . पहिल्याच दिवशी शाळेतून परतताना दप्तर घरी ना नेणारी या वर्गातली मुलं मला ही कसलं शिक्षण घेणार अशी शंका निर्माण करायला कारणीभूत ठरली . ' गृहपाठ नाही . जे काही करायचं ते वर्गातच ' ही यामागची संकल्पना . पुढे गृहपाठ दिला तो घरच्या ,निसर्गातल्या वस्तू आणण्याचा .

हे सगळं वाचताना मला जी शंका येत होती ती म्हणजे पालकांनी या अजबजगब शिक्षणपद्धतीची कशी दखल घेती असेल ? कारण सर्वसाधारण घरातील मुले मग ती मराठी वा इंग्रजी माध्यमात जात असो पालकांना त्यांनी अंक आणि अक्षरे , गाणी घरच्यांना आणणि बाहेरून येणारांना म्हणून दाखवावी हे अपेक्षित आणि आनंददायी असते . इथे ही मुले दोन महिने उलटले तरी यापैकी काहीच म्हणत नाहीत . म्हणतात काय ? तर ' जन गण मन ' . आणि मला त्याचे उत्तर गवसले ते पृ-९३ वर ' मुलंच पालकांचं समाधान करतात तेव्हा ..' या प्रकरणात . स्वातीचे वडील मुख्याध्यापकांकडे तक्रार करायला लागले, ' दोन महिने झाले तरी माझ्या मुलीला लिहिता आणि वाचता येत नाही .' मानेंच्या उपक्रमांचं त्यांना काहीच कौतुक नव्हतं . मानेंनी वर्गात नेऊन ते सारं दाखविलं .स्वातीच्या बाबांचा आरोप स्वतः स्वाती आणि इतर मुलांनी फ़ेटाळून लावला . ' लवकर लिहिता -वाचता यावं म्हणून शाळा नसते .जेव्हा तुमची मुलगी स्वतःहून म्हणेल आता आपण लिहूयात ,त्यावेळेस लेखनास सुरूवात होईल ' हे गुरूजींचं म्हणणं मलाही अव्यवहार्य वाटलं . मुलं तसं म्हणतीलच कशी अन कधी ? हा माझाही प्रश्न होता . आंणि याच उत्तर मिळालं ते ११० पृष्ठावर .'कृतीत दडलंय नवनिर्माणाचं पाखरू 'या लेखात .त्या दिवशी ममता उभी राहून विचारू लागली ,'गुरुजी ,अ ,आ आई कधी लिहायचं ?एक दोन कधी लिहायला देणार ?'मग तसं सर्वांनीच म्हटलं . मग इतके दिवस गुरुजींनी काय केलं ? माने यांच्यामते 'साधारणपणे पाच साडेपाच सहा वर्षांचा कालावधी हा भाषिक क्षमतांच्या अत्युच्च वेगवान असा कालावधी असतो . . यात भरपूर भाषानुभव मुलांना मिळायला हवेत .' त्यासाठी इतके दिवस वर्गात ,वर्गा बाहेर त्यांनी अनेक उपक्रम राबविले . त्यातून मुलांना विविध आकारांची ओळख झाली ,मुलांना वर्गीकरण ,ओळख ,वर्णन करण्याचं प्राथमिक ज्ञान अवगत करून देता आलं . मुलं सशक्त होणे ही लेखन तयारीची पूर्वअट असते .म्हणून मान्यांनी अशा लेखनपूर्व कृतींवर जास्तीत जास्त भर दिला . आणि महत्वाचे हे की नंतर हे सारे मलाही पटले . त्यासाठी माने यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे . या कालावधीसाठी त्यांनी जो संयम दाखविला तो अभूतपूर्व असा होता . त्यांनी कसलीही घाई ना करता सारे काही मुलांच्या कलाकलानेच घेतले हे विशेष .या कालावधीचे त्यांनी दोन गटात विभाजन केले . पहिला

गट– संवाद सेतू . हा संवाद शिक्षकांसह शालांतर्गत आणि शालाबाह्य अनेक गोष्टींतून प्रत्यक्ष घडवून आणला गेला . तर दुसरा गट– वाचनसेतू . हा भाग केवळ एक उपचार उरला होता . यात मानेंना फ़ारसे कष्ट पडले नाहीत .

माने या पुस्तकभर शाळा शिक्षण, विद्यार्थी, शिक्षक इत्यादीसंबंधी सुभाषितांसारखी वाटतील अशी अनेक विधानं करतात . त्यातली काही वानगीदाखल दिल्याशिवाय राहवत नाही . १–खरं तर प्राथमिक शिक्षणात शिक्षक आणि विद्यार्थी याचं नातं घट्ट झालं की उत्तम असं नवनिर्माण समोर येतं .(पृ–२१),खेळ ही खेळता खेळता शिकण्याची गोष्ट आहे .(पृ–२७),प्रत्येकाचं स्वतःचं नाव स्वतःसाठी काही खास असतं .लहान मुलांना तर आपली प्रत्येक वस्तू ,स्वतःच नाव प्रिय असते (पृ–४५),' चित्रसंवाद ' हा फ़क्त लहान वयातच नव्हे तर आयुष्यभर साथ देणारा असतो (पृ–४८),मुलांचं मन अगदी टीपकागद असतो (पृ–५४),बिजाला मातीत गाडून घेतल्याशिवाय नवनिर्माण होत नाही (पृ–५५),आमचा प्रत्येक दिवस म्हणजे उत्सवच ! आता आमच्यासाठी 'शाळा' म्हणजे नितांत सुंदर प्रवास वाटू लागला .(पृ–५८),अनुभवांची लयलूट करणारा आपला परिसर मुलांचा गुरू होऊ शकतो (पृ–६०),प्रेरणा असेल तर कल्पनांची कमतरता नसते (पृ–७३),शिकणे ही नैसर्गिक क्रिया आहे . जे नैसर्गिक घडते त्यातून आनंद मिळतो (पृ–७४), सहज शिक्षणाची सुरूवात कुटुंबातूनच होते (पृ–७५),शिक्षकाची भूमिका ही एखाद्या शिडासारखी असते (पृ–८२),स्पर्शाची भाषा कळणं म्हणजे हृदयाची भाषा कळणं (पृ–८२) ,पुस्तकाकडे हात जाणं ही सहज घडणारी गोष्ट व्हायला हवी (पृ–९८),अभ्यास आणि अंकज्ञान हे सर्व अभ्यासक्रमाचे अपरिहार्य अंग आहेत (पृ–१०८),साधारणपणे पाच साडे पाच सहा वर्षाचा कालावधी हा भाषिक क्षमतांच्या विकासाचा अत्युच्च असा वेगवान काळ असतो (पृ–११०),मुलांचा कुतुहलाचा तिसरा डोळा सतत उघडला जावा ,किंबहुना तो सतत उघडावा ,यासाठी तशा कृतींची आवश्यक्ता असते (पृ–१४४).ही सारी विधानं त्यांनी घेतलेल्या परिश्रमातून घुसळलेल्या लोण्यासारखी आहेत . ती त्यांची मेहनत ,उपक्रमशीलता यातील सातत्य टिकवून ठेवण्याची जिद्द याचं दिशादर्शन करतात . किंबहुना हेच त्यांच्या वर्षभराच्या अध्यापनवृत्तीचे सारतत्व आहे . म्हणून ही विधाने फ़ार मोलाची आहेत .

'गुरूजी ,तू मला आवडलास !' असं म्हणणारी ममता पेज नं .८१ वर भेटते . अन मग ११७ पेजवर शिक्षक दिनाच्या निमित्ताने वर्ग सहावीची शीतल (ह्याच शीतलने मला तिच्या आयुष्यातील पहिले पत्र पाठविले होते) 'सर जसं की माझे वडील आहेत तसे तुम्ही आहात .' असा शुभेच्छा संदेश एका पत्रातून देते . शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या मनात एवढा पराकोटीचा विश्वास निर्माण करणे ही सोपी गोष्ट नाही . ही गोष्ट सहजसाध्य नाही . अतिशय कष्टप्रद आहे . त्यासाठी युवराज माने हे नक्कीच अभिनंदनास पात्र आहेत .

या पुस्तकात लेखक मुलांची फ़क्त नावे वापरतात . त्यांची पूर्ण नावे वापरत नाहीत .पूनम प्रभू सोळंके हे एक पूर्ण नाव येते . पण ती वर्गातील मुलगी नसते . तिचं कुटुंब शाळेसमोरच्या पालात उतरलेलं . पण वर्गात जे काही सुरू असते त्याचं तिला आकर्षण वाटते . आणि ती त्याकडे आकर्षित होऊन खिडकीजवळ येऊन चोरून पाहते . माने तिला सन्मानाने वर्गात घेऊन येतात . हा प्रसंग खूप भावूक वाटतो . काही मुलं उसतोड कामगारांची असल्याने ती पालकांसोबत गाव सोडून जातात किंवा काही पालक उसतोडीला गेल्याने आजीसोबत घरीच राहतात . त्यांची शाळा सुटते. त्या गोष्टीचे दुःख लेखकाइतकेच वाचकालाही होते . ह्या सगळ्या घटनाक्रमात बाह्यजगातल्या एका गोष्टीची नोंद अस्वस्थ करते . एकदा बालसभेत खुशी 'सांगली कोल्हापुरातील मुलांचं घर वाहून गेल्यामुळे त्यांना किती दुःख झालं असेल ' यावरून ढसढसा रडते . या प्रकाराने मान्यांची मुलं किती संवेदनशील आहेत हे लक्षात येते .

किती लिहू अन किती नाही असं या पुस्तकाविषयी मला झालं आहे . किमान पहिल्या वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी ही ' ज्ञानेश्वरी ' ठरावी इतकं या पुस्तकाचं मोल आहे . त्यासाठी युवराज माने यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे .

– ९३२५०४४२१०

ऐतिहासीक संपाचा साक्षीदार

राजेंद्र पाटील
शिरपूर-धुळे

मी स्वत: एक जुनी पेन्शनधारक आहे. परंतु जुनी पेन्शन मागणी संदर्भात महाराष्ट्र समन्वय समितीच्या आवाहनाला अनुसरून धुळे जिल्ह्यातील आमच्या शिरपूर तालुक्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचारी बांधवांनी १४ मार्च २०२३ पासून संप पुकारला. ७ दिवस चाललेला हा संप दिवसेंदिवस तेजोमय होत गेला. भारतीय वैदिक संस्कृती ही सुर्यदेवतेला अर्घ्य देणारी पवित्र संस्कृती आहे. प्रत्येक संपकरी बंधु भगिनींच्या अंतर्मनात सुर्यप्रकाशागत तेजस्वीता,तपस्विता व तत्परतेची प्रखर ज्योत या संपाने प्रज्वलीत केली. यातूनच संघटना, संघटनकौशल्य व संघटनेची फलनिष्पत्ती काय असते, याचा मौलिक संदेश शासन, प्रशासन, कर्मचारी बांधव व समाजमनापर्यंत गेला. संघशक्ती कलौ युगे। संपूर्ण विश्वात युगानुयुगे संघशक्तीचाच विजय झालेला आहे. या ऐतिहासिक संपात निष्ठा, एकजुट, ऐक्य, समर्पणभाव, शक्ती, मनोधैर्य, मनपरिवर्तन, समाजपरिवर्तन, कलागुणांची जोपासना, संयम,संवेदनशीलता अशा विविध सदगुणांची ओळख झाली. नोव्हेंबर २००५ नंतर लागलेल्या युवा बंधु-भगिनींसाठी जुनी पेन्शनधारक जेष्ठ बंधुंनी स्वत:ला झोकुन देऊन १००% संप यशस्वीतेसाठी त्यांनी केलेला त्याग व सहभाग निश्चितच प्रेरणादायी होता. माझ्यासारख्या जेष्ठ शिलेदाराला या संपात सहभागी होता आले हे मी माझे परमभाग्य समजतो.आमच्या शिरपूर तालुक्यातील संप हा अतिशय शिस्त बध्द व नियोजनापुर्वक एक जुनीपेन्शन मागणीचे मिशन होते.संपात थाळीनाद,सामुहिक,प्रतिज्ञा, परिपाठ,स्फुर्तीगीते,पेन्शन मागणी बाबत घोषणा,अहिराणी-मराठी काव्य,पोवाडे,मोर्चा,भाषण,कथाकथन,इ. विविधप्रेरणादायी तंत्रांचा वापर करण्यात आला.दररोज

होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या ऑडिओ-व्हिडीओ तयार करण्यात आल्यात विविध तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तालुका जिल्हा राज्य व देशविदेशात संपकाळातील मागण्याचा तपशील हा सर्वापर्यंत पोहचला. यातुनच जुनी पेन्शन चळवळीला क्रांतीचे मुर्त स्वरुप प्राप्त झाले.१४ मार्च २०२३ च्या या संपात नारीशक्तीचा सहभाग हा विशेष उल्लेखनीय होता.भारतीय संस्कृती ही यत्र नार्यस्तू पुज्यन्ते रमन्ते तत्र देवता. या उक्तीप्रमाणे स्त्रीशक्तीचा सामर्थ्याचे पुजन करणारी

संस्कृती आहे. ८ मार्च २०२३ ला नुकताच जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आलेला होता. सद्यस्थितीत प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचे योगदान व त्याग खुपच महत्वाचा आहे. या संपकालावधीत सर्वच क्षेत्रातील माता-भगिनींनी आपले कुटूंब सांभाळुन कशाचीही तमा न बाळगता सर्वस्वाने झोकुन दिले. संपकाळातील महिला माता - भगिंनीचा हा समर्पणभाव युगानुयुगे सर्वांनाच प्रेरणादायी ठरेल. म्हणूनच त्या खऱ्याअर्थाने राजमाता जिजाऊ थोर शिक्षणतज्ञा सावित्रीबाई फुले, कुशल प्रशासक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या लेकी शोभतात.

१४ मार्च २०२३ च्या जुनी पेन्शन मागणी संपात सामाजिक राजकीय, व इतर सर्वच क्षेत्रातील योगदान खुपच महत्वाचे होते संपकरी बंधुभगिनींना उपासमार होऊ नये म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी जलदान, अन्नदान,आर्थिक दान इ. विविध माध्यामातून संपकरी बंधुभगिनींचे मनोधैर्य उंचावले. आपली भारतीय संस्कृती सर्वस्वाचा त्याग करणारी एक वैश्विक संस्कृती आहे. प्रेम, आपुलकी जिव्हाळा या भावविश्वाच्या माध्यमातून मनोबल वाढविण्याचे परमकार्य या समाजबांधवांनी केले. शिरपूर तालुक्यातील मा.सरपंच,त्यांच्या संघटना,व इतर सेवाभावी बंधुंनी संपाप्रती दाखविलेली अस्मिता ही संपकरी कर्मचारी कर्मचारी बंधुभगिनींसाठी प्रेरणादायी होती.

१४ मार्च २०२३ ते २० मार्च २०२३ या सात दिवसात संपाची तीव्रता शासनाला कळुन आली. २० मार्च २०२३ ला संप मागे घेण्यात आला. या सात दिवसात युवकांनी खुप मोठी जबाबदारी पार पाडली. १०० % पुर्ण संपात झोकुन दिले. स्वार्थ नसतांना संपातील जेष्ठांचा सहभाग व त्याग खुपच महत्वाचा होता. युवा बंधुभगिनींनी या सर्वांप्रती व्यक्त केलेला कृतज्ञनाभाव हा हृदयाला स्पर्श करुन गेला.

या संपाची फलनिष्पत्ती हा काळच ठरवेल.परंतु शासनाला या संपाची दखल घ्यावीच लागली हे ही नसे थोडके.खरा शासनकर्ता तोच असतो जो आपल्या प्रजेच्या हितासाठी सदैव तत्पर व कर्तव्यदक्ष असतो. संपकालावधीत राज्यशासनाने जुनी पेन्शन संदर्भात समिती स्थापना केली. संप संपल्यानंतर केंद्र शासनाने देखील केंद्रीय

कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्यासंदर्भात समिती स्थापना केलेली आहे. महाराष्ट्रातील या बुलंद संपाने राज्यशासन व केंद्र शासनाने जुनी पेन्शन मागणीकडे लक्ष वेधले हे ही नसे थोडके कारण ही ती वेळ होती. जुनी पेन्शन मागणी पुर्णत्वास जाईलच. परंतु तुर्तास दुर्दम्य आशावाद जुपया हीच प्रभुचरणी विनम्र पार्थना. संप आपला थांबला आहे, लढा संपलेला नाही. मिशन एकच आहे, फक्त आणि फक्त जुनी पेन्शन मागणी अन् जुनी पेन्शन मागणी.

एकच आस, एकच ध्यास!
जुनी पेन्शन मागणी नेऊ पुर्णत्वास।।

(श्री.राजेंद्र यशवंत पाटील हे मुख्याध्यापक म्हणून जि.प.शाळा डाबक्यापाडा ता.शिरपूर जि.धुळे येथे कार्यरत.)
-९४२३९०६२५०

संपाने आम्हांला काय दिले?

नारायण तायडे
जळगांव

राज्यातील शासकीय आणि मागील सात दिवसांपासून सुरु असलेला संप आज मागे घेण्यात आता. या संपातील किती मागण्या पूर्ण झाल्या आणि किती नाही हा संशोधनाचा विषय आहे.निमशासकीय कर्मचाऱ्यांचासंपातील प्रमुख मागण्या आणि सरकारने दिलेले आधासन यातील सत्यासत्यता येणारा काळच ठरवील. पण एक कर्मचारी म्हणून या संपाने आम्हाला काय दिले हा मोठा प्रश्न उभा राहिला आणि आपसूकच याचे उत्तर देखील मिळाले.संघटना म्हणजे काय हे कळाले-एकाच विचाराने प्रेरित होऊन एकाच उद्देशासाठी लढणारे लोक जेव्हा एकत्र येतात तेव्हा निर्माण होणारी सकारात्मक उर्जा म्हणजे संघटना संपकाळातील सात दिवसात ही उर्जा प्रकर्षानि जाणवत होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे, हत्तीस आवरी गवती दोर मुंग्याही सर्पास करती जर्जर !! रानकुत्रे संघटोनी हुशार!याप्र सिंहासी फाडती !! या दोन ओळींची प्रचीती या काळात आली.खरे शिलेदार पाहायलामिळाले-संघटन जेवढे महत्वाचे त्यापेक्षाही जास्त महत्वाचे याहे त्याचे नेतृत्व संपकाळात तर विविध क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना एकत्र आल्या. सर्वच संघटनांच्या पदाधिकाऱ्यानी युद्धकाळातील सरदारां प्रमाणे आपल्या भूमिका चोखपणे पार पडल्या. वादळातही ठामपणे पाय रोवून आपल्या ध्येयाशी ईमान राखणारे संघटनांचे शिलेदार आणि संप काळात त्यांनी केलेले काम नक्कीच प्रशंसनीय होते. या संपानिमित्त विविध संघटनाच्या शिलेदारांकडून नेतृत्व गुण शिकायला मिळाले. संघटनेचा शिलेदार आणि कार्यकर्ता या दोहोंमध्ये उत्तम संवाद आणि समन्वय हेच संघटनेचे यश असते आणि हेच यश या संपाने आम्हाला दिले.वरिष्ठांकडून पाहायला मिळाले. खरे बंधुप्रेम-स्वार्थ नसेल तर वेळप्रसंगी रक्ताची नाती साथ देत

नाहीत.सामाजिक क्षेत्रात वावरताना मानापमान, राग, लोभ, आरोप, प्रत्यारोप आलेच. सध्याच्या जगात प्रत्येकजण आपल्याला नेता समजतो. पण संपाच्या या लढ्यात अनेकांनी आपल्या महत्वकांक्षा बाजूला ठेऊन एका सामान्य कार्यकर्त्यांची कर्तव्य इमानदारीने पार पडलेली दिसत होती. अहंभावकिंवा न्यूनगंड बाजूला ठेऊन संप 'खरा 'कार्यकर्ता' जागोजागी दिसत होता. संघटना आणि संघटनेच्या पदाधिकायांच्या प्रती त्यांचा दिसणारा विश्वास हेच या वाटणार नाही. संपाचे यश म्हणावे लागेल. नेता होणे सोपे

असेल पण खरा कार्यकर्ता होणे खरच खूप कठीण दिव्य आहे, हेच या माध्यमातून अधोरेखित झाले.संपात महिलांचा सहभाग वाखाणण्याजोगा होता. पुरुषी वेश परिधान केला म्हणजे स्त्री-पुरुष समानता होत नाही. तर पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन किंबहुना त्याच्यापेक्षा एक पाउल पुढे चालणे म्हणजे खरी समानता हे आजतागायत ऐकले होते. परंतु याचा खरा परिचय संप काळात आला. संप काळात या रणरागिणीनी आपल्या पुरुष बांधवांच्या खांद्याला खांदा लाऊन केलेले काम म्हणजेच या लढ्याचे खरे यश म्हणावे लागेल. महिलांची एकजूट आणि संप काळात त्यांनी दिलेले योगदान यातून येणाऱ्या काळातखरा कार्यकर्ता पाहायला मिळाला-संघटनांचे नेतृत्व करायला महिला संकेत मिळत होते. भविष्यात संघटनाचे अध्यक्षपद एखाद्या महिलेले भूषविले तर आश्चर्यवैयक्तिक स्वार्थासाठी मोठ्या भावाने आपल्या लहान भावाला यशस्वी करण्यासाठी झटणारा आता सिद्ध झाल्या आहेत याचेच ठेवणाऱ्याची मनोवृत्ती पाहून काही वाऱ्यावर सोडल्याच्या असंख्य घटना आपल्याला ज्ञात आहेत. परंतु खरा बंधुभाव काय असतो, हे या संपाच्या माध्यमातून शिकायला मिळाले. जुन्या पेन्शनचे लाभार्थी असून देखील आपल्या सोबत काम करणाऱ्या कनिष्ठ सेवक सहकाऱ्यासाठी या लढ्यात उतरलेल्या वरिष्ठांचे पहिल्या दिवसापासूनच कौतुक वाटत होते. पेन्शनच्या या लढ्यात फक्त पाठींबा न देता येणाऱ्या समस्यांना छातीची ढाल करून झेलण्याचे काम करताना पाहताना नक्कीच मन भारावून जात होते. बंधुप्रेम-बंधुप्रेम म्हणतात ते यापेक्षा काय वेगळे असणार.संघटनेला लागलेले फितुरीचे ग्रहण-महिलां रणरागिणीनींची ताकत-अनुकूल दिवसांत दिसणारी शंभर डोकी म्हणजे संघटना नाही. तर प्रतिकूल दिवसांत साथ देणारे काही मोजके सहकारी म्हणजे संघटना. हवेबरोबर तॉड फिरवणारी आणि आपल्याच डबक्याच्या विश्वात डराव डराव करणारी डोकी म्हणजे संघटना नाही. संघटनेत विसंवाद होऊ नये याकडे सर्वजण गांभीर्याने लक्ष देत होते. असे असताना अहंकार डोक्यावर चढलेली आणि स्वतःला संघटनेपेक्षा मोठी समजायला लागलेल्या अनेक व्यक्ती देखील या काळात अनुभवायला मिळाली. संघटनेच्या विरुध्द कारवाया करणारे, संघटना आणि संपाबद्दल उलटसुलटबोलणारे, कार्यकर्त्यांच्या मनात नेतृत्वा विरुध्द खोटे, नाटे भरवणारे आणि संप यशस्वी होऊनये म्हणून देव पाण्यात काळातही मन विचलित झाले. अशा लोकांबद्दल मनात द्वेष भावना देखील निर्माण झाल्या. परंतु अशाही परिस्थिती संयमाने वागून आपला लढा यशस्वी करायचा असतो ही शिकवण या संपाने आम्हाला दिली.या आणि अशा अनेक अंगाने या संपाकडे पाहिलं तर अस वाटतं की या संपाने माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला खूप काही दित. संघटन आणि त्याचे महत्व अधोरेखित करणारा हा संप एकीचे बळ आणि सहकाऱ्याची साथ आयुष्यात किती महत्वाची असते हेच पदोपदी सांगत होता. त्यामुळे या संपाने मला काय दिले यापेक्षा या संपातून मी काय घेतेले हे महत्वाचे ठरले. आपल्या सर्वांची साथ यानिमित्ताने मिळाली. आपणसोबत काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्यच समजतो. एकजुटीची ही ताकत अशीच तेवत राहो हीच सदिच्छा.(साभार व्हॉटसअॅप)

(नारायण तायडे हे जि.प.शाळा बोरमळी पाडा ता.शिरपूर जि.धुळे येथे कार्यरत)

- ७५८८६४५७५९

विश्वातील १० आदर्श शिक्षिका

सारिका रंधे
शिरपूर - धुळे

विश्वातील १० आदर्श शिक्षिका हेलन वोल्फ लिखित(Terrific Women Teachers) व स्वाती काळे यांनी अनवाहित केलेले विश्वातील '१० आदर्श शिक्षिका ' हे शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल घडविणाऱ्या शिक्षिकांचा विलोभनीय शिक्षणप्रवास होय! हे पुस्तक वोल्फ यांनी त्यांच्या आईला समर्पित केले असून शिक्षिकेचा पेशा असलेल्या हेलन वोल्फ शिक्षकांची भूमिका महत्वापूर्ण असून तेच आपले आयुष्य घडवतात असेही म्हटले आहे.विश्वातील या दहा शिक्षिकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सामाजिक,राजकीय,शारिरीक आव्हानांना न कचरता ज्ञानदानाच्या कार्यात अक्षरश: झोकून दिले.त्यांचा परीचय लेखिनेने करून दिला आहे.पैकी कॅनडाच्या इतिहासात शिक्षणाचा पाया रोवणाऱ्या ओनेसिम डोरवाल ,दृष्टिहीन जगाला दृष्टी देणाऱ्या नी सुलिवॅान मेसी आणि हेलन केलर ,विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देणाऱ्या मॉटेसरी शाळेच्या जननी :मारिया मॉटेसरी,इंडोनेशियाची राष्ट्रीय नायिका-रादेन अयू कार्तिनी ,विद्यार्थ्यांना अंधारातून प्रकाशात आणणाऱ्या -फ्रिएद डिकर -ब्रॅडेइस,प्रत्येक विद्यार्थ्याची दखल घेणाऱ्या-मार्वा कॅालिन्स,निर्भय ह्याची पहिली महिला अंतराळ शिक्षिका :क्रिस्टा मकॅालिफ,गतिमंद आणि दिव्यांग मुलांसाठी आयुष्य वेचणारी -डेनिस फ्रुक्टर ,फ्रिडम रायटर्सची संस्थापक -एरिन ग्रुवेल,अफगाणिस्तानमधील एक धैर्यवान स्री -मलालाई जोया यांनी १९ व २० व्या शतकात शिक्षणक्षेत्रात दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर भरीव स्वरूपाची कामगिरी करून प्रयोगक्षमता सिद्ध केली.अध्यापनातून नवनिर्माणाचे अद्भूत कार्य उभे केले आहे.प्रारंभी आपले मनोगत व्यक्त करताना त्या म्हणतात 'शिक्षक हेच आपले आयुष्य घडवीत असतात.त्यांनी सांगितलेली एखादी गोष्ट आपल्या अंतर्मनात बीजरूपाने पेरल्या जाते आणि तिचा वटवृक्ष होऊन आयुष्यभर तो आपल्या मनाला सावली देतो. ‹ १) पैकी कॅनडाच्या इतिहासात शिक्षणाचा पाया रोवणाऱ्या ओनेसिम डोरवाल या नन होत्या.बहुभाषिक व अध्यात्मिक होत्या.फ्रेंच ,इंग्लिश इ. भाषा त्यांना अवगत होत्या.अनाथ,कष्टकरी ,दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांना अध्यापनासोबतच आरोग्याकडे लक्ष दिले.दोन्ही भाषेतून शिक्षण देण्याची हातोटी होती.आजच्या सारखे वेगळे वर्ग तेव्हा उपलब्ध नसायचे एकाच वर्गात शिकायचे .त्यामुळे शिक्षकांना सर्व वर्गाचा अभ्यासक्रम अवगत असायचा.त्यांच्या या अविरत कार्याची दखल घेत कॅनडा सरकारने सासकोन नदीवरील चार बेटांना त्यांचे नाव २)दृष्टिहीन जगाला दृष्टी देणाऱ्या नी सुलिवॅान मेसी आणि हेलन केलर ही जगप्रसिद्ध गुरूशिष्याची जोडी होय!निसर्गाने कोणालाही रिकाम्या हाती पाठवले नाही हे खरे होय.एींशीू उहळश्रव ळी सशपळीी असे गुरू.रविंद्रनाथ टागोर म्हणतात.द मिरॅकल वर्कर हा त्यांच्या जीवनावर चित्रपट देखील गाजला.नी स्वत:अर्ध अंधत्व होत्या त्यांना मुककर्णबधीर मुलांची सांकेतिक भाषा अवगत होत्या.हेलन केलरला घडवण्याचे आव्हान स्वीकारले तेव्हा ती हुशार आहे हे त्यांना जाणवले.तिच्यासाठी स्पर्शज्ञानाची प्रयोगक्षम शिक्षणपद्धती

तयार केली.हळूहळू सर्व वस्तू ती हातावर गिरवण्याचा सराव करू लागली.आणि हेलन चमत्कारीकरित्या अभ्यास करू लागली.टेलीफोनचे जनक अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांनीदेखील या दोहोंची दखल घेऊन उच्चशिक्षणासाठी मदत करतात.पुढे दोघी उच्चशिक्षण घेतात.वाचन लेखन करू लागते.मुकबधीर दिव्यांगासाठी त्यांच्या कल्याणासाठी आयुष्यभर दीपस्तंभाप्रमाणे जगल्या. ३)विद्यार्थ्यांना प्राधान्य देणाऱ्या मॉंटेसरी शाळेच्या जननी मारिया मॉंटेसरी व इटलीतील डोट्टोरेसा म्हणून ओळखल्या जाण्याऱ्या म्हणजे मानवी जैवशास्त्र ज्या मेडीकल शाखेसाठा स्रींयाना शिकण्यास मज्जाव होता व रोमच्या वैद्याकिय विद्यापीठाने लागोपाठ तीनदा प्रवेश नाकारला होता परूंतू जिद्दीच्या जोरावर डॉक्टर झालेल्या इटलीतील पहिली महिला डॉक्टर होय!इटली देशात एका आर्मी अधिकाऱ्याच्या सधन कुटूंबात जन्म झाला.असामान्यातले सामान्यत्व हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट होय.सर्वप्रथम पंचेद्रियांना शिक्षण आणि नंतर बुद्धीच्या वापराचे शिक्षण या त्यांच्या ब्रीद ठरलेल्या ध्येयातूनच बालमंदीर पाळणाघरातील प्राथमिक शिक्षणपद्धतीचा उगम झाला व ती आजतागायत सर्वत्र अबलंबली जात आहे.लहानग्यांचे भावविश्व जाणून त्यांच्यात शिक्षणाचे बाळकडूच त्यांना या धोरण शिक्षणपद्धतीत साकारले. ४)इंडोनशियाची राष्ट्रीय नायिका रादेन अयू कार्तिनी यांनी तेथे स्रीशिक्षणाची चळवळ उभी केली व मुलींसाठी पहिली शाळा जावा येथे सुरू केला.म..फुलेंसारखे पती त्यांच्या पाठीशी भक्कपणे उभे राहिल्याने त्या करू शकल्या.कारण मुलींना शिक्षणाचा अधिकार नव्हता.चूल आणि मूल एवढेच काय ते त्यांचे अस्तित्व होते.त्यांनी स्वत:उच्चशिक्षण घेतले. ५)विद्यार्थ्यांना अंधारातून प्रकाशात आणणाऱ्या फ्रिएद डिकर बँडेइस या व्हिएन्ना ास्ट्रीया येथील ज्यू कुटूंबात जन्मलेल्या उत्तम चित्रकार होत्या. १९३४ साली देशात डॉल्फ हिटलर आणि त्यांच्या नाझी पक्षाची दहशत होती. त्यांनी कम्युनिस्ट आणि ज्यू लोकांना छळछावण्यात पाठवले.तिथे काही लहान मुलांना त्यांच्या आई वडिल व कुटूंबापासून दूर करून कैद केले होते.तिथे काही कलाकार देखील होते.त्यात फ्रिएद यांचाही समावेष होता.त्या व त्यांच्या सहकाऱ्यांना तेथील लहान मुलांना गुप्तपणे दोन वर्षे शिक्षण दिले.सुरक्षारक्षकाला संशय येणार नाही या पद्धतीने त्या रंगकाम व हस्तकला तसेच कविता लिहायला शिकवले.आजही ही चित्रे टेरेझेन येथे म्युझियममध्ये जपून ठेवली आहेत.अन्याय अत्याचाराची निराशाजनक कहाणी जरी ते सांगतात तरी अशा दहशतमय परिस्थितीत त्या आशेचा किरण बनून आल्या. ६)प्रत्येक विद्यार्थ्याची दखल घेणाऱ्या मार्वा कॉलिन्स या अमेरिकेतील सुप्रसिदध शिक्षिका होय.कृष्णवर्णीय असल्याने शिक्षणापासून वंचित राहण्याच्या प्रसंगापासून त्या दूर राहिल्या व पदवी प्राप्त केल्यानंतर नोकरी व पुढे १९७५ मध्ये स्वत: ची थर्शीीळवश झीळर्शिीर्शीर्ीूं लिहेश्र सुरू केली.त्यांचे पहिले प्रेम त्यांचे विद्यार्थी होते आणि त्यांना मुलांमध्ये शिकण्यातला आनंद शोधायला मदत करायाची होती.त्यांना मुलांमध्येस्वत्वाची जाणीव ,स्वाभिमान व स्वातंत्र्य या गोष्टी रूजवायच्या होत्या .शिक्षणात सहजता आणण्यासाठी त्यांना आपल्या प्रयोगक्षमतेतून सोपी पुस्तक कोडी वाचायला देणे ,शिक्षणप्रवाहात गरजू विद्यार्थ्यांना टिकवून ठेवण्यासाठा मदत करणे ई.कार्य केले. पहिली महिला अंतराळ शिक्षिका क्रिस्टा मर्कॉलिफ म्हणून तिला जागतिक प्रसिद्धी मिळाली.बोस्टन येथील मॅसॅ च्यपसेट्स येथील क्रिस्टा ने स्काउट ,,व्यायामपटू, स्किईंग, आणि सॉफ्टबॉल पियानो अशी 'र्शिीरींळश्रश शिीपरश्रळीूं होती,अमेरिकेत शिक्षिकी पेशात असताना त्यां इतिहास शिकवायच्या आणि इतिहास घडवला देखील.अंतराळात जाण्यासाठी नासाने अर्ज सोडले तेव्हा १ जुलै १९८५ रोजी आलेल्या अर्जापैकी अंतिम दहामध्ये क्रिस्टाची निवड झाली. मुलाखतीत सुद्धा उत्तीर्ण झाली.चार महिने खडतर असे प्रशिक्षण पूर्ण करून अखेर चॅलेंजर २८ जानेवारी १९८६ रोजी क्रिस्टा व इतर सह अवकाशवीरांनी उड्डाण घेतले.परंतू दुर्दैवाने ४८ ,००० फुटांवर अवकाशयानाचा स्फोट होउन सर्व मृत्युमुखी पडले.पण त्या लखलखत्या तारा ठरल्या. अमेरिकेत गतिमंद आणि दिव्यांग मुलांसाठी आयुष्य वेचणारी डेनिस फ्रुक्टर या स्वत: दिव्यांग होत्या .दिव्यांगांच्या शारिरीक व मानसिक अभ्यास करून त्यांच्यासाठी उन्हाळी कॅम्प सुरू केले.यात दिव्यांग मुले आनंदाने सहभागी होऊन नैपुण्य मिळवू लागले.कॅलिफोर्नियातील एक उत्तम लेखिका 'फ्रीडम रायटर्स' ची लेखिका 'एरिन ग्रुवेल यांनी innovative कल्पनांनी व तरल पद्धतींनी शिक्षणक्षेत्रात ठसा उमटवला.आर्थिकदृष्ट्या दुर्बल ,अतिशय अज्ञानी व गुंड

नव्या साधन सुविधांकरवी वाढावी वाचन संस्कृती

साधना क्षीरसागर
अहमदनगर

वाचाल तर वाचाल असे म्हटले जाते. भारतीय संस्कृतीत वाचन संस्कृतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संतांनी अनेक विषयी ग्रंथ लिहून मानव जीवनाला दिशा देण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले आहे. लाखो पुरातन ग्रंथसंपदा आपल्या भूमीला मिळालेले एक वरदान आहे. त्याचा फायदा नव्या पिढीला करून देताना केवळ पारायण करीत बसून चालणार नाही तर नव्या साधन सुविधांचा उपयोग करून ती संस्कृती वाढवावी लागणार आहे. त्यामुळे आता काळानुसार वाचन संस्कृतीची पद्धतीही बदलणे तितकेच आवश्यक आहे.

गुरुकुल पद्धत चालली मावळतीला

भारतीय संस्कृतीत ऋषीमुनींकडे गुरुकुल पद्धती होती.अगदी राजे महाराजे सरदार यांचीही मुले गुरुकुल पद्धतीनेच शिक्षण घ्यायचे. पूर्वी सर्वच शिक्षणासाठी गुरुकुल पद्धत होती. आजही पारमार्थिक शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये ही पद्धत आहे. काही शाळा ही तशा पद्धतीने शिक्षण देतात. या पद्धतीत रोज सक्तीचे वाचन करून घेतले जाते. नुसतेच वाचन नव्हे तर तोंड पाठ करून घेतले जायचे त्यामुळे ज्या विषयांचे आकलन करून घ्यायचे तो उद्देश साध्य होत होता.आजही अनेकांचे ग्रंथ तोंडपाठ आहेत त्या वेळची परीक्षा पद्धती ही त्याला अनुसरून होते. शिक्षण पद्धतीत नव्याने होत असलेले बदल स्वीकारून मुलांना वाचनाचे आवड निर्माण करणे आवश्यक आहे. आज केवळ तोंड पाठ करून चालणार नाही तर त्या विषयाचे संपूर्ण आकलन होणे आवश्यक आहे.

नवे तंत्रज्ञान स्वीकारण्याची गरज

साहित्य क्षेत्राचा विचार केला तर लाखो पुस्तके आपल्या सानिध्यात येऊन जातात पुस्तक तयार करताना लेखकाने केलेले संशोधन व समाजासाठी त्याचा उपयोग

शून्य होतो.त्यामुळेच अत्याधुनिक साधनांच्या साह्याने पुस्तके वाचायला शिकले पाहिजे. पूर्वीप्रमाणे एखादी कादंबरी घेऊन सलग चार-पाच तास वाचन करीत बसायचे दिवस संपल्यात जमा आहे.त्यामुळे ग्रंथालयातील गर्दी कमी झाली आहे. अनेक पुस्तके धूळ खात पडून आहेत. तेही अनमोल ज्ञान आहे अनमोल संशोधन आहे. त्याची समाजाला गरजही आहे ,परंतु तरीही समाजातील लोकांपर्यंत पोहोचण्यात अनेक अडथळे येत आहेत. या सर्वांवर मात करून पुस्तक वाचण्याची सवय लावण्यासाठी नवे तंत्र स्वीकारणे अगदी उचित ठरेल.



सोशल मीडियाची डाटा निर्मिती सोशल मीडियावर सध्या हजारो लेखक तयार झाले आहेत. या साहित्यात मोकळेपणा आहे. प्रत्येक जण काही ना काही साहित्य निर्मिती करीत असतो. परंतु हे साहित्य क्षणीक असते. असे असले तरी चांगले साहित्य हे वर्षानुवर्ष व्हायरल होताना दिसते. सोशल मीडियावर वाचन किती केले जाते हा संशोधनाचा भाग असला तरी बहुतेक जण मोबाईलशी खेळत वेळ घालवत असल्याचे दिसते. ग्रंथसंपदेचे वाचन घडवून आणण्यासाठी ही संधी आहे. जुन्या ग्रंथातील महत्त्वाचे विषय सोशल मीडियावरच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविले तर ते वाचले जातील नव साहित्यांकांनी हे आवर्जून करायला हवे, कारण त्यानिमित्ताने त्यांचे वाचन होऊन प्रगल्भता अधिक वाढू शकेल. संगणक प्रणाली चा घ्यायला हवा तेवढा लाभ आपण घेतला पाहिजे. सध्या इंटरनेटच्या माध्यमातून बहुतेक ग्रंथ वेबसाईटवर स्कॅन करून टाकलेले आहेत. अनेक संगणक प्रणाली अशा आहेत की ज्यावर ग्रंथ अपलोड केलेले असतात. त्याचे वाचन घडवून आणणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांना शक्यतो पुस्तक रूपाने वाचन घडवून आणायला हवे. परंतु मोबाईल इंटरनेटचा अतिरेकी वापर होत असेल, तर त्यांना डिजिटल पुस्तकाकडे आवर्जून वळवले पाहिजे. आगामी काळात डिजिटलायझेनपासून आपण दूर राहू शकत नाही. त्यातही डिजिटल असलेले आपले आवडते पुस्तके वाचनास दिले तर त्याचा फायदा अधिक होऊ शकतो. वाचनालयाचे डिजिटलाययझेशन हवे वाचनालयाची दयनीय स्थिती सर्वश्रुत आहे. पुस्तके विकत घेऊन ते वाचनासाठी नागरिकांना उपलब्ध करून देणे अवघड होऊन बसले आहे. सभासद फी जमा न होणे ,सरकारी अनुदानातून वंचित राहणे, लोकांनाही वाचनाचे आवड कमी झाल्याने ते वाचनालयापर्यंत न येणे या समस्या वाचनालयाच्या पुढे उभ्या टाकल्या आहेत, त्यामुळे वाचनालयाची पद्धतीत बदल आणून डिजिटल फार्म मध्ये येणे आवश्यक आहे. पुस्तके डिजिटल स्वरूपात लोकांना उपलब्ध करून देण्यासाठी पुस्तकाच्या लिंक तयार करून त्या लोकांपर्यंत सोशल मीडियाच्या माध्यमातून दिल्यास वाचन संस्कृती वाढण्यास मदत होईल त्यामुळे वाचनालयाची पध्दत व वाचनाची पद्धत आता काळाच्या ओघात बदलणे अधिक उचित ठरेल.

(साधना जयवंत क्षीरसागर ह्या जि.प.शाळा कौडगाव ता.जि.अहमदनगर येथे कार्यरत.)

– ८६०५६४०९२६

मराठी मासिक
शिक्षणयात्री

हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक लक्ष्मण गोरख बडगुजर यांच्या मालकीच्या प्रगती आर्टस्,पोलिस स्टेशन जवळ,जनता नगर शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र) येथे छापून ,प्लॉट नं. ५२ शिवपार्वती कॉलनी,करवंद नाका,शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक – शैला नंदकिशोर हजारे **Reg No.MAHMAR2015/67226**

कथा

लाखांमधील एक..!

एकनाथ आव्हाड
चेंबूर

माधव कुणाच्या जवळ राहतो रे ? बरेच दिवस झाले तो शाळेच्या ऑनलाइन तासाला आलाच नाही. बरं,त्याचा फोनही लागत नाही. झूम ॲपवर ऑनलाइन तास सुरू असताना आठवी ब च्या वर्गशिक्षिका मुळेबाईंनी माधवबद्दल मुलांना विचारले. माधवचा विषय निघताच चिन्मयच्या मनाला चुटपुट लागली. कारण माधव चिन्मय हे दोघे खास मित्र....अगदी पहिलीपासून. खरंतर, चिन्मयनेसुद्धा माधवला दोन तीन वेळा फोन केला होता, पण त्याचाही फोन लागलाच नाही.कोरोनाच्या महामारीमुळे घरातच ऑनलाइन शाळा भरत होती. पण एक दोन आठवड्यापासून माधवच नेमका तासाला नसायचा.आज मुळेबाईंनी माधवच्या अनुपस्थितीचा विषय असा अचानक काढताच चिन्मयच्या मनात अनेक शंकाकुशंका यायला लागल्या. काय झालं असेल बरं? माधव कसल्या अडचणीत तर सापडला नसेल ना? नको नको असा विचार त्याच्या मनात यायला लागले.लगेच मनातल्या विचारांना थोपवून स्वतःला सावरत तो बाईंना म्हणाला, बाई, मी कळवतो तुम्हांला लवकरच माधवबद्दल . हो, नक्की कळव . असं म्हणून बाईंनी शिकवायला सुरुवात केली. पण आजच्या तासाकडे चिन्मयचं लक्ष नव्हतंच मुळी. राहून राहून त्याच्या मनात माधवचाच विचार येत होता. आजचे सर्व ऑनलाइन तास झाल्यावर चिन्मय आईला जरा काळजीनेच म्हणाला, आई, अगं माझा मित्र माधव ना, सध्या ऑनलाइन तासाला येतच नाही. काय झालं असेल गं? मी जाऊन येऊ का त्याच्याघरी? चिन्मयचं बोलणं ऐकून त्याची मोठी बहीण श्रावणी लगेच त्याला म्हणाली, चिन्मय ,अरे या कोरोना काळात तुम्ही मुलांनी घराबाहेर पडू नये, कोरोनाचा त्रास तुम्हाला होऊ नये म्हणून तर शाळेने हे ऑनलाइन तास घरीच सुरु केले आहेत ना? पण तू नको माधवची काळजी करूस. आपण बाबांना पाठवू त्याच्या घरी. मी आत्ताच फोन करते तसा बाबांना. कामावरून घरी येताना ते त्याच्या घरी जाऊन येतील. माधवची चाळ माहीतच आहे बाबांना. ताईच्या बोलण्याने चिन्मयला हायसे वाटले. त्याच्या जीवात जीव आला. श्रावणीने लगेच बाबांना फोन लावलाही आणि त्यांचाही तिकडून लगेच होकार आला. आईला आपल्या मुलांच्या तत्परतेचं, निर्णयाचं कौतुक वाटलं. संध्याकाळी बाबा कामावरून घरी येताना माधवच्या घरी ते जाऊन आले. बाबांकडून माधवबद्दल ऐकायला चिन्मय उत्सुक होता. पण बाबांनी चिन्मयला हातानेच खूण करुन थोडं थांबायला सांगितले. अंगावरचे सर्व कपडे धुवायला टाकून कोरोनाच्या या परिस्थितीत आधी त्यांनी स्वच्छ आंघोळ केली. घरातले कपडे घातले. मग चहा घेताना चिन्मयला ते म्हणाले, चिन्मय , तुझ्या मित्राच्या घरी गेलो होतो मी. अरे, त्यांचा मोबाईल हरवलाय आणि आता नवीन मोबाईल घ्यायला सध्या त्यांच्याजवळ पैसे नाहीत. त्याच्या आईचं घरकाम या कोरोनामुळे सुटलंय.शिवाय कापडी पिशव्या विकण्याचा त्यांचा धंदाही थांबलाय आता. बघू म्हणाले नंतर.. चिन्मयने काहीतरी विचार केला आणि तो पटकन आतल्या खोलीत गेला. आपला पैसे बचत करुन ठेवायचा गल्ला तो बाहेर घेऊन आला. तो गल्ला बाबांकडे देत तो

म्हणाला, बाबा, या गल्ल्यात चार वर्षांपासून मी पैसे बचत करतोय. आपण या पैशातून माधवला नवीन मोबाईल घेऊन देऊया का? तो तासाला आला तर त्याचा अभ्यास बुडणार नाही. बाबा... वडील नाहीत त्याला, तो काम करुन शिकतो.शाळेत येण्यापूर्वी, तो कापडी पिशव्या विकतो.... पण बाबा, या कोरोना काळात कापडी पिशव्या विकायला तो बाहेर कसा पडणार? त्याची आईच घरीच शिलाई मशिनवर शिवते कापडी पिशव्या. आणि माधव त्या पिशव्या बाजारात विकतो. घरखर्चाला तो हातभार लावतो.बाबा, प्लीज, आपण देऊया ना त्याला एक मोबाईल. चिन्मयच्या हट्टापुढे वडिलांचे काहीच चालेना. शेवटी गल्ला फोडला. आठ हजार रूपये साठले होते गल्ल्यात. बाबांनी त्यात आणखी दोन हजार रूपये घालून दहा हजाराचा एक चांगला ॲण्ड्राईड मोबाईल ऑनलाइनच बुक केला. दोन दिवसात मोबाईल घरी आला. बाबांनी त्यात नवीन सिमकार्ड टाकून त्यात इंटरनेट डाटा भरला. आणि माधवला तो नवा मोबाईल ते देऊन आले. 'आता तासाला जॉईन होत जा. आणि तुझा राहिलेला अभ्यास चिन्मयला फोन करुन त्याच्याकडून घे.' ...असंही माधवला आवर्जन सांगून ते निघाले . चिन्मयने पाठवलेल्या मोबाईलकडे पाहताच माधवचे डोळे भरून आले. माधवच्या आईने हे पाहिले. आई म्हणाली, माधव बाळा, किती मोठ्या मनाची ही माणसं आहेत. दुसऱ्यांच्या मदतीला धावणारी. तुझा मित्र चिन्यय मित्र तर खूप भारी आहे. खरंच आई, माझा मित्र चिन्मय हा खूपच भारी आहे .अगदी लाखांमधील एक! मी नेहमीच सगळ्यांना सांगतो.माझा मित्र चिन्मय,

नावासारखाच हुशार भारी करूच शकत नाही,
त्याची कुणीच बरोबरी
उंच झाडावर चढण्यात, तो आहेच सराईत
नदीत पोहून जाण्यात, तर एकदम पटाईत
एका दमात जातो, उंच डोंगर चढून
अडचणीतून काढतो मार्ग, नाही बसत दडून
मित्रांच्या गप्पांत तर, त्याची पाहावी कमाल
किस्से सांगतो रंगवून, उडवून देतो धमाल
अभ्यासाच्या वेळी अभ्यास, खेळाच्या वेळी खेळ
अभ्यास आणि खेळाचा, छान साधतो ताळमेळ
इतिहास भूगोल त्याचा, असतो सारा तोंडपाठ
अवघड गणिताची सुद्धा, तो सोडत नाही पाठ
संकटात सापडले कुणी, तर मदतीला जातो धावून
अभिमान वाटतो मला, त्याचे प्रत्येक काम पाहून
स्वभावाने आहे प्रेमळ, वागण्यात फारच नेक
असा हा माझा मित्र ,आई लाखांमधील एक ...!

आई म्हणाली, कमाल! किती सुंदर काव्यमय वर्णन केलंस तू तुझ्या मित्राचं. यामुळे चिन्मय अगदी माझ्या डोळ्यांसमोर उभा असल्याचा भास झाला रे.आई त्याने दिलेल्या या फोनवरुन मी पहिला फोन त्यालाच करतो.होय होय, नक्की कर बाळा! असं म्हणून आई तिच्या कामाला स्वयंपाकखोलीत गेली.नवीन मोबाईलवरुन माधवने पहिला फोन लावला आपल्या मित्राला...चिन्मयला. माधव म्हणाला, चिन्मय ,तुझ्या या मोबाईल भेटीबद्दल मी काय बोलू मित्रा. तुझ्यामुळे माझी थांबलेली शाळा आता पुन्हा सुरू होईल बघ .आणि ही गोष्ट मी कधीच विसरु शकणार नाही . पण चिन्मय, मित्रा, माझं एक ऐकशील? कोरोनाचे हे संकट कमी झाल्यावर मी पुन्हा जोमाने कापडी पिशव्या विकण्याचे काम सुरू करणार आहे. तेव्हा मी मोबाईलला लागलेले सर्व पैसे तुझ्या बाबांना नक्की परत करेन. आणि तेव्हा तू ते पैसे घ्यायला हवेत. घेशील ना? मला वचन दे. चिन्मयला क्षणभर यावर काय बोलावं कळेना. पण एका मित्राचा स्वाभिमान दुस-या मित्राने जपलाच पाहिजे, असे चिन्मयला वाटले. आणि तो म्हणाला, ठीक आहे मित्रा. जशी तुझी इच्छा. आईची काळजी घे आणि आता ऑनलाइन तासाला रोज ये... अरे, केवढी काळजी वाटली होती मला. बोलता बोलता चिन्मयचे डोळे इकडे भरून आले होते. आणि तिकडे माधवचेही. फुकटची वस्तू कुणाकडूनही घेऊ नये, ही माधवच्या मनातली घालमेल जशी चिन्मयला कळत होती. तशीच मित्राचं शिक्षण कुठल्याच कारणामुळे अडू नये ही चिन्मयची धडपडही माधवला समजत होती. कारण न बोलताही मित्रांच्या मनातलं सारं काही सांगून जाते... तीच तर खरी मैत्री असते ना...!

- ९८२१७७७९६८
eknathavhad23gmail.com

विज्ञान कथा

मंगळ सफारी केबल कारने...

सौ.प्रतिक्षा पापळकर
कारंजा लाड

आता मानव हा पृथ्वीचा कैळी राहिला नव्हता. पृथ्वी बाहेर फेरफटका मारण्याची विलक्षण ओढ या पिढीत निर्माण झाली होती.

२१२२ मे महिन्याची दुपार. राजू मीनी, ॲना,जेसस आणि योसुक रखरखत्या उन्हात योसुकच्या घरी सगळे जमले होते. सगळ्यांच्या चर्चेचा एकच विषय होता तो म्हणजे मंगळ सफारी. हे सर्व किशोरवयीन मुलं मंगळसफारीला जाण्याचे planning करीत होते. पण योसुकला मात्र त्याचे आई बाबा अवकश सफारीला त्याला पाठवयला तयार नव्हते. त्यांची परवानगी घेण्यासाठीच ते सर्व त्याच्या घरी जमले होते. तेवढ्यात योसुक सर्वांसाठी एक न्युज घेऊन आला तो न्युज सांगणार इतक्यात मीनी योसुकला विचारते अरे तुझे आई बाबा नाही का म्हणतात, आमच्यासोबत मंगळ सफारीला? तर योसुक म्हणतो, अग त्यांना स्पेस मध्ये zero gravity मध्ये वावरतांना मला त्रास होईल याची भीती वाटते. म्हणून ते नकार देत आहेत.

त्याला कारणही तसेच होते.योसुकची तब्येतही थोडी नाजुकच होती. त्यामुळे सर्व मित्रांना प्रश्न पडला योगसुकला न्यायचे तर आहेच पण त्याला त्रास झाला तर अंतराळ्यानात उपचार करायचे कसे ? इतर सर्व zero gravity मध्ये कसे राहायचे याचा सराव करणारच होते. मंगळ सफारीला जाण्याआधी त्या सरावाची गरजच आसणार होती. सन २१२२ चा काळ होता तो, १०० १५० वर्षापूर्वी भारतात मुल जंगलसफारीला जात होती.... पण आता.... आता मंगळसफारी सुरु झाली होती... या मुलांची चर्चा जोरात सुरु असतांनाच राजुच्या स्क्रीन वर एक जाहीरात आली आणि तो ओरडलाच इंग्लो जपान स्पेस कंपनी ची ती जाहिरात वाचून सर्वच आनंदाने नाचू लागले

ती जाहीरात अशी होती.मंगळसफारी आता बुलेट ट्रेनने ! चला चला ..zero gravity चे टेन्शन घेऊ नका अगदी सहज जणू तुम्ही पृथ्वीवरच आहात अशा थाटात तुम्हाला कमीत कमी किंमतीत मंगळ सफारी करता येईल पाच जणांच्या गृपला सवलत सोबत (चंद्राची सॅर) चंद्र सफारीही! चला तर अंतराळाचा नजारा अनुभवू या! अवकाशाचे सौंदर्य बघू याची संधी गमावू नका !

मंगळसफारी दि.२५ जानेवारी २०२१ वेळ दुपारी ४.३० दुपारी zero gravity ची practice करण्याची गरज नाही. ही न्युज कळल्याबरोबर सर्वांनी आनंदाने उड्या

मारल्यास त्यात नवल नव्हते योसुक म्हणाला अरे हेच तर मी मघाशी सांगत होतो. पण तुम्ही मला बोलूच दिले नाही. चला तर आपण पहिले बुकींग ऑफीसला ऑनलाईन व्हीझीट द्यायची का ?

योसुकच्या आईबाबांनी न्युज वाचल्यावर त्याला मंगळ सफारीला जाण्याची परवानगी तर दिलीच पण तेही ऑनलाईन व्हीजीट साठी लगेच तयार झाले.

राजूने advance and Integrakd Indo japan space company चे यामाशुको आणि डॉ.गुप्ता यांना ऑनलाईन चर्चे साठी बोलवले.सर्वांना या इंटरेस्टींग मंगळ सफारीबद्दल कमालीची उत्सुकता होतील. ती अधिक ताणून न धरता डॉ.यामाशुको म्हणाले ही मंगळ सफारी ज्या बुलेट ट्रेन किंवा केबल कार ने तुम्ही करणार आहात ती कार पृथ्वीपासून चंद्रापर्यंत आणि पुढे मंगळापर्यंत धावणार आहे. सर्वांना खुप आश्चर्य वाटत होते. कारण आतापर्यंतच्या अवकाश भाग किंवा मंगळसफारी या अंतराळयानातूनच होत होत्या पण आत बुलेट ट्रेनने किंवा केबल कारने जाता येणार होते. केबल कार वा.. क्या बात है.। ही एखादी कवीकल्पना नव्हती तर जपानने भारताच्या सहकार्याने ती प्रत्यक्षात आणली होती.

या अंतराळ सफारी बद्दल डॉ.यामाशुको मुलांना अधिक माहिती देतांना सांगतात,

अंतराळातील हा प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी बुलेट कॅप्सुल मध्ये पृथ्वीवरील वातावरण आणि गुरुत्वाकर्षण कृत्रिम रित्या तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे आमच्या बुलेट ट्रेनने अंतराळ सफारी करणाऱ्यांना ती अगदी Homely वाटेल

मीनी – अरे वा हे तर छानच झाले पण ही ट्रेन तयार कोणी केली. ?

डॉ.गुप्ता – भारतीय संशोधकांनी जपानच्या सहकार्याने ही ट्रेन तयार केली असून या संपुर्ण प्रोजेक्ट ला hexatrack असे नाव देण्यात आले आहे.

राजु – पण असे नाव का दिले ?

डॉ.– गुप्ता या बुलेट ट्रेनमध्ये षटकोनी आकाराच्या capsules असतील त्यांना hexa capsules असे म्हटले जाते. म्हणून ट्रेनला hexatrack असे नाव दिले.

योसुक – पण मग zero gravity चे काय ? ते कसे solve करणार ?

डॉ.यामाशुको – या capsules मध्ये मध्यभागी एक हलणारे उपकरण असेल वातावरणातील कमी गुरुत्वाकर्षणाचे दुष्परिणाम जाणवू नयेत यासाठी या संपूर्ण प्रवासात सगळीकडे सारख्या प्रमाणातील गुरुत्वाकर्षण कृत्रिम रित्या रोखले जाणार आहे. त्यामुळे मध्ये अगदी homely वाटेल.

राजु – त्या capsules चा आकर किती मोठा असेल आम्ही सर्व म्हणजे पाचही जण त्यात येऊ शकू का ?

डॉ.यामायुको – पृथ्वी आणि चंद्र यांना जोडणारी मीनी capsules ची जिच्या १५ मीटर असेल पुढच्या प्रवासासाठी म्हणजे चंद्र आणि मंगळ यांना जोडण्यासाठी ३०मीटर त्रिज्या असलेली capsules असेल ५ जणांच्या अतिशय आरामदायी आहे.

अ‍ॅना – या cable car बद्दल आणखी माहिती सांगा ना.

डॉ.गुप्ता – अति वेगवान maglev train मध्ये जे तंत्रज्ञान Electo magnetic वापरतात ते तंत्रज्ञान यासाठी वापरले आहे. या Express Car ला space express असेही म्हणतात. ही train standard guage track वर चालेल human spocology centre मध्ये चंद्रावरील स्टेशन lunor station आणि मंगळावरील station marce station या नावाने ओळखले जातील. तर पृथ्वीवरील station tera siation म्हणून ओळखले जाईल.

जेसस – या cablecar किंवा space expresss चे आणखी काय स्पेशल आहे. ?

डॉ.गुप्ता – बहुतेक अंतराळप्रणाली पृथ्वीवरील नैसर्गिक रचनेचे महत्व दुर्लक्षित करतात. परंतु गेल्या १०० वर्षांपासून म्हणजे २०२२ पासून भारत व जपान या देशांचे space scientist या cable car मध्ये असलेल्या मध्ये पृथ्वीवर

ज्या सुविधा जे नैसर्गिक वातावरण मिळतं तसाच अनुभव अधिवास या प्रवासात तुम्हाला घेता यावा यावर संशोधन / प्रयत्न करीत होते. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन ते प्रत्यक्ष साकार झाले आहे.

अंतराळात राहण्यासाठी आणि अंतराळ प्रवासासाठी सुयोग्य प्रकारची रचना तयार करण्यात आली आहे. एका शंकूच्या आकाराच्या असलेल्या या संरचनेला ग्लास असे नाव देण्यात आले आहे.

ग्लास मध्ये वनस्पती,झाडं,पाणी ट्रान्सपोर्ट सिस्टिम इत्यादी गोष्टीही त्यात विकसित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अवकाशातील मानवी वसाहत अधिकाअधि सुखकर करुन आपला अंतराळप्रवास मजेदार होईल, यात शंका नाही.

जेसस – सर मला एक सांगा आपण १५ जानेवारी २१२४ हीच तारीख व दुपारी ४. ३० हीच वेळ का घेतली त्यात बदल करता येणार नाही का ?

डॉ.यामाशुको – पृथ्वी या ग्रहावरुन निघालेली केबल कार अंतरिक्ष यानाच्याही अधिक वेगाने प्रथम चंद्रावर आणि नंतर मंगळावर जाईल पृथ्वीला वरुन मंगळाकडे निघालेली केबल कार सुरु करण्याची वेळ व दिवस शास्त्रज्ञांना पृथ्वीची गती,चंद्राची गती आणि मंगळाची गती इत्यादींचा हिशोब करुन ठरवावी लागते.

नाहीतर काय होईल ? जेव्हा अंतरिक्षयान मंगळाचा कक्षेवर पोहोचेल तेव्हा मंगळच तीथे नसायचा,कदाचित तो हजारो मैल दूर गेलेला असायचा. अशावेळी आपल्या केबल कारला अंतरिक्षाला थांबून मंगळाची वाट पहात बसणे शक्य ठरेल का ? नाही ना मग ती केबल कार सरळ पुढे जाईल आणि आपल्या लंबवर्तुळाकार कक्षेवरुन फेरा पुर्ण करुन ज्या बिंदूवरुन निघाले त्याच बिंदूवर येईल. आणि अशाप्रकारे सारी चढाई अशस्वी होईल.

सर्वजण – बापरे असे आहे की का ? याचा तर आम्ही विचार केला नव्हता ok thanks Dr gupta आणि डॉ.यामाशुको तुम्ही आम्हांला या अनोख्या मंगळ सफारीची खुप नवीन माहिती सांगितली आम्ही लगेच praocess पूर्ण करतो आणि येतोच मंगळ सफारीला असे सांगून सर्वांनी इन्डो जापान स्पेस कंपनी च्या स्पेस सिलेक्शन सोबतची ऑनलाईन मिटींग व्हीझीट संपवली आणि लागले तयारीला मंगळसफारीच्या !

आपणही बघू या स्वप्न अशा धडाडीच्या मंगळसफारीचे आणि उलगडून बघू या रहस्य अवकाशाचे!

(प्रतिक्षा पापळकर या गणितज्ञ व शिक्षणतज्ञ Maths study and reaserch centra karanja **च्या संस्थापक आहेत.)**

– ९५२७९८०४०९

ओळख जागतिक नागरिकत्व शिक्षणाची..

योगेद्र गिरासे
शिरपूर-धुळे

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००५ (NCF-2005) नुसार लोकशाही आणि समानता ,न्याय ,स्वातंत्र्य ,धर्मनिरपेक्षता ,शाश्वत विकास ही सामाजिक मूल्य विद्यार्थ्यामध्ये रुजवणे हे उद्दिष्ट आहे .या साठीच शैक्षणिक अध्यापनात ग्लोबल सिटीझनशिप एज्युकेशन (GCE) म्हणजे जागतिक नागरिकत्व शिक्षण हि नवी कल्पना २१ व्या शतकात उदयास आली आहे . हि संकल्पना देशभरातील शिक्षकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रादेशिक शेक्षणिक संस्था भोपाल येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले .ही कार्यशाळा डॉ.संगीता पेठीया व डॉ स.सेबु यांच्या मार्गदर्शनात पार पडली.महाराष्ट्रातील शिक्षकांना जागतिक नागरिकत्व शिक्षण(global citizenship education) ही संकल्पना परिचित व्हावी या करिता हा लेख लिहिला आहे .

जागतिक नागरिकत्व शिक्षण म्हणजे काय -

Global citizenship education (GCE) हा एक शैक्षणिक दृष्टीकोन आहे ज्याचा उद्देश व्यक्तींना जबाबदार आणि व्यस्त जागतिक नागरिक बनण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये, दृष्टिकोन आणि मूल्ये विकसित करणे आहे. हे शिकणाऱ्यांना गंभीरपणे विचार करण्यास, लोकांमधील परस्परसंबंध समजून घेण्यास आणि सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय न्यायाला चालना देण्यासाठी कृती करण्यास प्रोत्साहित करते.

ऋछए मध्ये गरिबी, असमानता, हवामान बदल आणि मानवाधिकार यासारख्या जागतिक समस्यांबद्दल शिकवणे आणि विविध संस्कृती आणि पार्श्वभूमीतील लोकांबद्दल सहानुभूती, आदर आणि एकतेची भावना विकसित करण्यात विद्यार्थ्यांना मदत करणे समाविष्ट आहे. यामध्ये युनायटेड नेशन्स, ग्लोबल गव्हर्नन्स आणि आंतरराष्ट्रीय

विकास यांसारख्या आपल्या जगाला आकार देणाऱ्या संस्था, प्रक्रिया आणि प्रणालींबद्दल शिकवणे देखील समाविष्ट आहे.

GCE द्वारे, विद्यार्थी जागतिक समस्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता विकसित करतात आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी माहितीपूर्ण कृती करतात, मग ते समुदाय सेवा, सक्रियता किंवा वकिलीद्वारे असो. GCE चे अंतिम ध्येय अधिक न्याय्य आणि शाश्वत जग निर्माण करणे हे आहे, जिथे प्रत्येकाला सन्माननीय आणि परिपूर्ण जीवन जगण्याची संधी आहे.

GCE हे समजून घेण्यावर आधारित आहे की आज जगासमोरील आव्हाने जटिल आणि एकमेकांशी जोडलेली आहेत आणि त्यांना संबोधित करण्यासाठी जागतिक सहकार्य आणि जबाबदारीची सामायिक जाणीव आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी जागतिक दृष्टीकोन विकसित करणे आणि त्यांच्या कृतींचा जगावर कसा परिणाम होऊ शकतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

सामाजिक अभ्यास, विज्ञान आणि भाषा कला यासारख्या विविध विषयांमध्ये आणि विषयांमध्ये GCE समाकलित केले जाऊ शकते. हे सेवा-शिक्षण प्रकल्प, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि सिम्युलेशन यासारख्या अनुभवात्मक शिक्षण क्रियाकलापांद्वारे देखील शिकवले जाऊ शकते.

एकूणच, २१ व्या शतकातील GCE हा शिक्षणाचा एक महत्त्वाचा घटक आहे, कारण तो विद्यार्थ्यांना सक्रिय आणि व्यस्त नागरिक बनण्यास तयार करतो जे अधिक शाश्वत आणि न्याय्य जगामध्ये योगदान देऊ शकतात

जागतिक नागरिकत्व शिक्षण पैलू -

जागतिक नागरिकत्व शिक्षणामध्ये अनेक पैलूंचा समावेश होतो.

●सांस्कृतिक जागरूकता आणि प्रशंसा:- विविध संस्कृती, परंपरा आणि जीवन पद्धती समजून घेणे आणि त्यांचे मूल्यमापन करणे आणि जागतिक समुदायांचे परस्परसंबंध ओळखणे.

●सामाजिक न्याय आणि मानवी हक्क:- वंश, लिंग, धर्म किंवा सामाजिक-आर्थिक स्थितीची पर्वा न करता सर्व व्यक्तींसाठी समानता, सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांच्या तत्त्वांचा प्रचार करणे.

●पर्यावरणीय स्थिरता:- पर्यावरणावर मानवी क्रियाकलापांचा प्रभाव समजून घेणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि जतन करण्यासाठी शाश्वत पद्धतींचा प्रचार करणे.

●शांतता निर्माण आणि संघर्ष निराकरण:- संघर्षांवर शांततापूर्ण आणि अहिंसक उपायांना प्रोत्साहन देणे आणि विविध गट आणि संस्कृतींमध्ये संवाद आणि समजूतदारपणाला प्रोत्साहन देणे.

●आंतरविद्याशाखीय शिक्षण:- विद्यार्थ्यांना जटिल जागतिक समस्या आणि त्यांचे परस्परसंबंध समजण्यास मदत करण्यासाठी आंतरविद्याशाखीय शिक्षण आणि गंभीर विचार कौशल्याच्या महत्त्वावर जोर देणे.

●जागतिक जागरुकता आणि प्रतिबद्धता:- विद्यार्थ्यांना जागतिक समस्यांमध्ये गुंतण्यासाठी आणि सक्रिय आणि जबाबदार जागतिक नागरिक बनण्यासाठी प्रोत्साहित करणे, मग ते स्वयंसेवा, वकिली किंवा नागरी सहभागातून असो.

जागतिक नागरिकत्व शिक्षणाची उद्दिष्टे :-

१)संज्ञानात्मक - जागतिक ,प्रादेशिक ,राष्ट्रीय आणि स्थानिक बदल ज्ञान ,समाज,आणि गंभीर विचार ,समस्या आणि विविध देश व लोकसंख्या परस्पर संबंध आणि परस्परावलंबन.

२)सामाजिक /भावनिक - समान मानवतेची भावना असणे ,मूल्य आणि जबाबदारी सामाईक करणे ,सहानुभूती ,एकता आणि फरक आणि विविधतेचा आदर करणे

३)वर्तणूक - शाश्वत जगात अधिक शांततेसाठी आणि स्थानिक ,राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर प्रभावीपणे व जबाबदारीने कार्य करणे

जागतिक नागरिकत्व शिक्षणाची शैक्षणिक तत्वे -

●संवाद आणि सहभाग -वर्गात लोकशाही आणि उदारमतवादी वातावरण असावे.जिथे विध्यार्थ्यांना विचार करण्याचे आणि मत मांडण्याचे स्वातंत्र असावे .

●अध्यापनाचा समग्र आणि आंतर- विषय दृष्टीकोन - हा दृष्टीकोन लोक आणि पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या सर्व संबंधित मुद्द्यांवर परस्परसंबंधांवर लक्ष केंद्रित करतो. यात वेगवेगळ्या दृष्टिकोनातून समस्यांचे विश्लेषण करणे समाविष्ट आहे.

●मुल्यांची निर्मिती -शिकण्याने केवळ तथ्ये जाणून घेणे किंवा लक्षात ठेवणे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे नाही तर शिकणाऱ्यांमध्ये सहानुभूती, सहिष्णुता आणि परस्पर आदर यासारख्या मूल्यांचा विकास देखील केला पाहिजे.

●मल्टी - मोड्यूल लर्निंग स्टडीज -याचा अर्थ अध्यापन आणि शिकण्याच्या नाविन्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण किंवा बहुविध धोरणांचा वापर केला जातो. यामध्ये पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके किंवा दृकश्राव्य जसे की चित्रपट आणि माहितीपट इत्यादींचा समावेश असू शकतो. हे कला एकात्मिक शिक्षण तसेच रेखाचित्र वापरून असू शकते. चित्रकला, संगीत नृत्य किंवा चळवळ-आधारित क्रियाकलाप किंवा थिएटर. या सहभागी अध्यापनामुळे शिकणाऱ्यांना वैयक्तिक स्वातंत्र्य मिळेल आणि त्यांच्या मनाला, हृदयाला आणि आत्म्याला स्पर्श होईल.

पाठात जागतिक नागरिकत्व शिक्षण कसे वापरावे -

जागतिक नागरिकत्व शिक्षण हे विषय आणि श्रेणी स्तरांच्या विस्तृत श्रेणीमध्ये पाठ योजनांमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. पाठ योजनेत जागतिक नागरिकत्व शिक्षणाचा वापर करण्यासाठी येथे काही पायऱ्या आहेत ज्यांचे तुम्ही अनुसरण करू शकता:

१)शिकण्याची उद्दिष्टे ओळखा:- धड्यासाठी विशिष्ट शिक्षण उद्दिष्टे निश्चित करा, जसे की एखादी विशिष्ट संकल्पना किंवा कौशल्य समजून घेणे.

२)जागतिक समस्या निवडा:- एक जागतिक समस्या निवडा जी शिक्षणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असेल आणि त्याचा उपयोग अर्थपूर्ण पद्धतीने विषय शिकवण्यासाठी करता येईल. उदाहरणार्थ, जर तुम्ही हवामान बदलावर विज्ञानाचा धडा शिकवत असाल, तर तुम्ही वैज्ञानिक प्रक्रिया, डेटा विश्लेषण आणि प्रायोगिक रचना शिकवण्यासाठी ग्लोबल वॉर्मिंगचा मुद्दा वापरू शकता.

३)जागतिक नागरिकत्वाची व्याख्या करा:- जागतिक नागरिकत्वाची संकल्पना मांडा आणि ती विद्यार्थ्यांसाठी परिभाषित करा. आपण स्पष्ट करू शकता की जागतिक नागरिक होण्यात विविध संस्कृती समजून घेणे आणि त्यांचा आदर करणे, एखाद्याच्या कृतीची जबाबदारी घेणे आणि जगाच्या चांगल्यासाठी योगदान देणे समाविष्ट आहे.

४)जागतिक समस्या जागतिक नागरिकत्वाशी संबंधित करा:- जागतिक समस्या जागतिक नागरिकत्वाच्या संकल्पनेशी जोडा. या समस्येचा जगभरातील लोकांवर कसा प्रभाव पडतो आणि त्यावर उपाय शोधण्यासाठी आम्ही एकत्र कसे काम करू शकतो हे स्पष्ट करा.

५)उपक्रमांची योजना करा:-विद्यार्थ्यांना जागतिक समस्या प्रदर्शित करण्यात आणि त्यांची जागतिक नागरिकत्व कौशल्ये विकसित करण्यात मदत करणारे उपक्रम विकसित करा. उदाहरणार्थ, तुम्ही विद्यार्थ्यांना या समस्येचे संशोधन करण्यास सांगू शकता, भिन्न दृष्टीकोनांवर चर्चा करू शकता आणि त्यांचे स्वतःचे निराकरण विकसित करू शकता.

६)शिक्षणाचे मूल्यांकन करा:- मूल्यांकन धोरण वापरा जे सामग्रीचे ज्ञान आणि जागतिक नागरिकत्व कौशल्य दोन्ही मोजतात. उदाहरणार्थ, आपण विद्यार्थ्यांना एक प्रकल्प तयार करण्यास सांगू शकता जो जागतिक समस्येबद्दल त्यांची समज आणि इतरांशी सहयोग करण्याची त्यांची क्षमता दर्शवेल.

एकंदरीत, जागतिक नागरिकत्व शिक्षणाचा धडा योजनांमध्ये वापर केल्याने विद्यार्थ्यांना त्यांचे जगातील स्थान समजण्यास, इतरांबद्दल सहानुभूती आणि आदर निर्माण करण्यास आणि सक्रिय आणि जबाबदार जागतिक नागरिक बनण्यास मदत होऊ शकते.

वरील सर्व माहिती पाहता जागतिक नागरिकत्व शिक्षण (GCE) संकल्पना ,तिची उद्दिष्टे व प्रत्येक्ष अध्यापनात वापर तुमचा लक्षात आला असेल .आपण ही अध्यापन करताना GCE चा वापर करावा व एक जागतिक नागरिक घडविण्यात योगदान द्यावे हीच अपेक्षा .

(योगेंद्र नाटूसिंग गिरासे हे सहशिक्षक म्हणून पांडू बांपू माळी म्युनि.हायस्कूल,शिरपूर जि.धुळे येथे कार्यरत)

-९४२२२३३३६६

टॉमी फ्रॉगमाऊथ

प्रा.डॉ.नंदा हरम
पुणे

शीर्षक वाचून काही अर्थबोधच होत नाही. खरं ना ? हे आहे एका पक्ष्याचं नाव.हा मुख्यत्वे आस्ट्रेलिया,तास्मनिया आणि इतर अनेक ठिकाणी आढळतो. या पक्ष्याचं मोठं डोकं,जड शरीर,रंग तसेच तो निशाचर असल्यामुळे ते घुबड आहे असे वाटते. ऑस्ट्रेलियन बुबूक या घबुडाची साद या पक्ष्याशी मिळतीजुळती असल्यामुळे गोंधळात आगखीच भर पडते. लक्षात ठेवायचं की हे घुबड नाही. आपण पुढे बघणारच आहोत या,पक्ष्यात आणि घुबडात काय फरक आहेत?

बाह्यरुप :- फ्रॉगमाऊथची उंची साधारण १३ ते २१ इंच असून वजन फक्त २०० ते ५०० ग्रॅम असते.

आकृती (क्र.१)

पाहिल्यावर लक्षात येईल की याची चोच रुंद,बोजड असते.डोळे मोठे आणि घुबडाप्रमाणेच पिवळ्या रंगाचे असतात. शरीर थोडंसं बोजड असतं. गोलाकार पंख आणि छोटेसे पाय असतात.तीन वेगवेगळ्या रंगात फ्रॉगमाऊथ सापडतो, पण सर्वसाधारणपणे राखाडी रंग जास्त आढळतो. नर आणि मादीचे रंग मात्र वेगवेगळे असतात. याची चोच राखाडी किंवा काळसर असून टोकाला थोडीशी बाकदार असतात. चोचीच्या वर रोम किंवा केस असतात.आकृती (क्र.२ पहा) राखाडी रंगांच्या पिसांवर लालसर पट्टे असतात.

घुबडापासून वेगळे काय? :- फ्रॉगमाऊथचे पाय छोटेसे तर असतात., पण त्याला नख्या नसतात.घुबडाच्या पायाला तीक्ष्ण नख्या असतात. (आकृती क्र.३ पहा) या पक्ष्यांचे डोळे डोक्याच्या बाजूला असतात. तर घुबडाचे डोळे पुढच्या भागात असतात. (घुबड नख्यांच्या सहाय्याने भक्ष्य पकडतं,तर फ्रॉगमाऊथ चोचीमध्ये भक्ष्य पकडतं) फ्रॉगमाऊथ हा पक्षी उघड्यावर,फांदीवरती बिनधास्तपणे विश्रांती घेतो. आणि त्याचं कारण म्हणजे त्याचा रंग आणि त्वचेची पोत झाडाच्या सालीबरोबर अशी काही मिसळून जाते,की तो फांदीवर बसलेला लक्षातच येत नाही.

(आकृती क्र.४ पहा.)

तो त्याचं घरटेही फांद्यांच्या बेचकीत बांधतो. याउलट घुबड मात्र दाट झाडीमागे विसावते,तसेच झाडाच्या ढोलीत घरटे बांधते,महत्वाचा फरक म्हणजे घुबडांना पुर्ण किंवा अंशत: फेस डिस्क असते.(आकृती क्र.५ पहा) पाहिल्यावर तुमच्या लक्षात येईल की डोळ्याभोवती पिसं अंतर्गोल पध्दतीने रचलेली असतात.तसेच घुबडांचे कान मोठे,असममित असतात. या दोन्ही गोष्टी,फ्रॉगमाऊथ या

पक्ष्यात आढळत नाहीत.

छद्‌मवेष :- घुबडांपासून असलेल्या वेगळेपणातच आपण पाहिलं की त्यांच्या शरीराचा अंग आणि पोत

झाडाच्या खोडासारखी असते. तसेच हे पक्षी अशा तऱ्हेने बसतात. (आकृती क्र.४ ब पहा)

की ती एखादी तुटलेली फांदीच वाटावी हालचाल न करता ते बसून राहतात. ही त्यांची संरक्षणाची क्लृप्ती आहे. भक्षकापासून धोका निर्माण झाल्यास मोठे पक्षी म्हणजे पालक आवाज करुन आपल्या पिल्लांना शांत आणि अविचल राहण्याकरिता काही खास संदेश देतात.

खाद्य :- ट्रॅनी फ्रॉगमाऊथ हे मांसाहारी पक्षी आहेत. विशेष म्हणजे ऑस्टेलियातील जे पीडादायक कीटक किंवा पक्षी आहेत,त्यांचा बंदोबस्त करणारे असे परिणामकारक हे पक्षी समजले जातात. कारण घर,शेत,बाग या ठिकाणी पीडादायी ठरणाऱ्या किटकांचा पक्ष्यांचा यांच्या खाद्यात समावेश होतो. या व्यतिरिक्त छोटे-छोटे सस्तन प्राणी,साप,बेडुक,उंदीर हे ही त्यांच्या भक्ष्य स्थानी असतात. सहसा फ्रॉगमाऊथ भक्ष्य चोचीत पकडून मग फांदीवर बसतो. त्याचा भुगा करुन खातो.पण त्यापेक्षा मोठे भक्ष्य म्हणजे पाल, उंदीर असल्यास फांदीवर आपटून त्याला मारतो आणि मगच ग्रहण करतो.. दिवसा तो भक्ष्यासाठी

वणवण करत नाही. उलट फांदीवरती तोंड उघडं ठेऊन (आकृतीक्र.६पहा) बसलेला असतो.अनायस एखादा किटक बसला तर त्याला आयतं खाद्य मिळतं संध्याकाळ झाल्यावर मात्र भक्ष्याच्या शोधार्थ तो बाहेर पडतो.

प्रजनन :- टॉनी फ्रॉगमाऊथचे वैशिष्टये असे की त्यांनी एकदा का आपला जोडीदार निवडला की त्याच भागात एक दशक किंवा त्याहून जास्त काळ ते जोडीने राहतात. ऑगस्ट ते डिसेंबर हा त्यांचा प्रजननाचा काळ असतो. दोघंही मिळून फांद्या, पालापाचोळा एकत्र करुन घरटे बांधतात. घरट्याच्या व्यास साधारण एक फूट असतो.छोट्या काटक्या पानं,गवतं असं घरट्याच्या मध्यावर घालून तो भाग मऊ केला जाते. मादी एकावेळी १ ते ३ अंडी घालते.

रात्रीच्या वेळी दोघे आळीपाळीने अंडी उबवण्याचे काम करतात तर दिवसा ना अंडी उबवतो. अंड्यातून पिल्लू बाहेर आले की दोघेही आळीपाळीने त्यांना अन्न भरवण्याचे काम करतात.२५-३५ दिवसांत पिल्लू उडण्यास तयार होते. एक वर्षाच्या आत ते लैगिंक परिवक्व होतात.

आवाजातील वैविध्य :- एकमेकांशी संपर्क साधण्याकरीता तसेच भोवतालची माहिती,भक्ष्य आणि भक्ष्यकाविषयी सूचना देण्याकरीता टॉनी फ्रॉगमाउथ वेगवेगळ्या प्रकारचे आवाज काढून एकमेकांना संदेश देतात. संपर्क साधण्याकरीता सहसा कमी आयाम आणि वारंवारीता असलेल्या आवाजाचा उपयोग करतात आपण धोक्याची सूचना देतांना मारलेल्या किंकाळ्या अनेक मैल दूरवर ही ऐकू येतात. या पक्ष्यांची पिल्लं भूक किंवा भीती व्यक्त करण्यासाठी विशिष्ट तऱ्हेचा आवाज काढतात. या आवाजाव्यतिरिक्त मोठ्या पिल्लांमध्ये काही हवं असेल,तर मोठा आवाज काढण्याची क्षमता ही प्राप्त होते. विश्रांती घेत असताना जर विचालित झाला तर फ्रॉगमाऊथ भुंग्यासारखा गुणगुण आवाज करतो. जर धोका निर्माण झाला तर मोठा फसफस आवाज करतो. तसेच चोचीने कडकड असा आवाज करतो. रात्रीच्या वेळी४ सेकंदात आठ वेळा,या वारंवारितेने फ्रॉगमाऊथ धीर गंभीर आणि सतत ऊं.ऊं.उं... असे डुरकत राहातो. अशी घरघर रात्रभर परत परत चाल असतो. याच बरोबर तो सारख्याच वारंवारीतेने आणि कमी तीव्रतेने हू-हू-हू- असे सौम्य आवाज ही काळात असतो. प्रजनन काळामध्ये तसेच त्याच्या आधीही नर आणि मादी यांचे जणुकाही व्दंद चालते ते एकमेकांना साद घालताना एकाआड एक किंवा एकाचवेळी घालतात.

तापमान नियमन :- टॉनी फ्रॉगमाऊथ ऑस्टेलिया खंडात सर्वत्र आढळतात. याखंडात

हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात तापमान टोकं गाठतं,अनुक्रमे ० सें.ग्रे.किंवा त्याहून कमी आणि ४० से.ग्रें.किंवा त्याहून जास्त आणि उल्लेख केल्याप्रमाणे हा पक्षी मोकळ्या फांदीवर बसतो,त्यामुळे हिवाळ्यात व उन्हाळ्यात अशा टोकाच्या स्थितीत शरीराच्या तापमानाचे नियंत्रण करणे,हे फ्रॉगमाऊथ करिता आव्हानच असते. उन्हाळ्याच्या दिवसात प्रखर प्रकाशात हा पक्षी अशा फांदीची निवड करतो,जिथे दिवसभर ऊन पडणार नाही. काही केलेल्या चाचण्यांमध्ये असे आढळून आले आहे की चोच न उघडता हा पक्षी तिप्पट वेगाने श्वसन करतो. जर त्यांच्या शरीराचे तापमान ४.५ सें.ग्रे.वाढले, तर मात्र त्यांना दम लागायला सुरुवात होते. जर उष्णता वाढली तर फ्रॉगमाऊथच्या तोंडातील रक्तवाहिन्यांमधील रक्तप्रवाह वाढतो तसेच तोंडात म्यूकसची (श्लेष्मा) निर्मिती वाढते, ज्यामुळे आत येणारी थंड होऊन शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होते.हिवाळ्यात ते अशा फांदीची निवड करतात,जिथे जास्त ऊन येईल,ज्यामुळे त्यांचं शरीराचे तापमान वाढण्यास मदत होते. तसेच विश्रांती घेतांना एकमेकांना चिकटून दाटीवाटीने बसतात,ज्यामुळे शरीराची ऊब मिळते. दिवसा जमिनीवर ५ मिनिटांपर्यत अंगावर ऊन घेण्यासाठी ते अविचल बसतात. अशातऱ्हेने जमिनीवर बसलेले असतांना फ्रॉगमाऊथ चोच उघडी होऊन,डोळे मिटून आपलं डोकं एका बाजूला वळवतात. जेणेकरुन सुर्यकिरण पिसांमध्ये घुसतील.

सुप्तावस्था :- हिवाळ्याच्या दिवसांत अन्नाचा तुटवडा असतो. तसेच शरीरात साठवलेले मेद फार काळ ऊर्जा देऊ शकते नाही. हिवाळ्यात टिकाव धरुन राहण्याकरिता फ्रॉगमाऊथना दिवसा आणि रात्री सुप्तावस्थेचा आधार घ्यावा लागतो. सुप्तावस्थेत हृदयाचे स्पंदन आणि चयापचयाचा वेग मंदावल्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होते आणि याचाच परिणाम म्हणजे उर्जेची बचत होते. मुलांनो लक्षात घ्या,सुप्तावस्था ही शीतनिद्रेपेक्षा थोडी वेगळी आहे, सुप्तावस्था फक्त काही तासापुरती असते. हिवाळ्यात नियमितपणे रोज काही तासांपुरतीच सुप्तावस्था घेतली जाते. पहाटे घेतलेली सुप्तावस्था अगदी कमी कालावधीकरिता असते आणि यामुळे शरीराचे तापमान ०.५ ते १.५ सें.ग्रें.कमी होते. तर रात्रीच्या वेळी घेतलेली सुप्तावस्था काही तास टिकते.यामुळे शरीराचे तापमान १० सें.ग्रे.कमी होऊ शकते. फ्रॉगमाऊथचे आयुष्य साधारण १०-१५ वर्षांचे असते.आधी उल्लेख केला,ज्याप्रमाणे त्यांचे नावही फसवे आहे. टॉनी म्हणजे पिवळसर तपकिरी रंगाचा,मुख्यतत्वे तो राखाडी रंगाचा असतो. चित्रावरुन लक्षात आलं असेलच की त्याचे तोंड नाही बेडकासारखे नसते,तरी नाव मात्र फ्रॉगमाऊथ नाव आणि दिसणं..दोन्ही ही फसवं! अर्थात शेक्सपिअरने म्हटलंच आहे,नावात काय आहे?

- ९३७२९१०३०६

विश्वातील १० आदर्श शिक्षिका

पान नं. १८ वरुन

प्रवृत्तीच्या मुलांना त्यांनी घडवले.सोपी शिक्षणपद्धती विकसित केली.एरिन ग्रुवेलच्या दृष्टिकोनातून तिने शिकवलेली सहनशीलता ही एक खिडकी आहे जेथून मुले जगाकडे निर्व्याज मनाने पाहू लागली.

अफगाणिस्तानमधील एक धैर्यवान स्त्री मलालाई जोयांनी स्त्रीयांच्या शिक्षणासाठी मोठा लढा उभारला.अर्थातच अफगाणिस्तानसारख्या धुमसणाऱ्या, ,कट्टर तालिबानी व दहशवादाने युक्त देशात स्त्रीयांना शिक्षण अमान्य होते.मलालाई यांच्या कुटूंबियांना देखील निर्वासित म्हणून राहत होते.अफगाणिस्तानच्या निवडणूकीत ती उभी राहिली व जिंकून आली .ध्येय केवळ एकच स्त्रीहक्क ! यादरम्यान तिच्यावर अनेक हल्ले झाले.मृत्युच्या सावटाखाली ती जीव ओतून आंदोलन ,भाषणं करीत असते.स्मित जयांची चैतन्य फुले शब्द जयांचे नवदीप कळे कृतीत ज्यांच्या भविष्य उजळे प्रेमविवेके जे खुलती तेथे कर माझे जुळती

सारिका निशांत रंधे
९८५०२४७१२२

शिक्षणयात्री

लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट - शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

संपर्क :शिक्षणयात्री शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे 8208301001shikshanyatri11@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23

सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

ई अंक (फक्त पी.डी.एफ.) व्दिवार्षिक वर्गणी - ५००

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

With pay any app

....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री

शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2021-23

संपादक - शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,
करवंद नाका,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
४२५४०५

प्रती, ...
....
....

Pragati Arts Shirpur 8421356261